सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १६ सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १६३ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## राज्यात टीईटी परीक्षा २३ नोव्हेंबरला

पुणे : इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गात अध्यापनासाठी अनिवार्य असलेली शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी परीक्षा २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. महाराष्ट्र परीक्षा परिषदेकडून टीईटी परीक्षेची तारीख जाहीर करण्यात आली. परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावरून उमेदवारांना ऑनलाईन अर्जनोंदणी व शुल्क भरता येणार आहे. तसेच अर्ज केवळ ऑनलाईन पद्धतीने व इंग्रजी भाषेतून भरायचे आहेत, अशी माहिती परीक्षा परिषदेकडून देण्यात आली. इयत्ता पहिली ते पाचवी आणि सहावी ते आठवी या वर्गांसाठी शिक्षक पदावर नियुक्ती होण्याकरिता सर्वप्रथम टीईटी परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. सर्व परीक्षा मंडळे, सर्व माध्यम आणि अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षकांसाठी टीईटी बंधनकारक आहे. पहिली ते पाचवी साठी पेपर १ आणि सहावी ते आठवी साठी पेपर २ घेण्यात येतो. ऑनलाईन अर्ज व परीक्षा शुल्क भरण्यासाठी दि. १५ सप्टेंबर ते दि. ३ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. प्रवेशपत्राची ऑनलाईन प्रिंट काढण्यासाठी १० नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबरपर्यंत मुदत आहे. पेपर एक २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १ यावेळेत तर पेपर दोन दुपारी २.३० ते सायं. ५ यावेळेत घेण्यात येईल. अर्ज सादर करताना येणाऱ्या अडचणींसाठी परीक्षा परिषदेकडून हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. उमेदवारांना सकाळी १० ते सायं. ६ यावेळेत हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधता येईल. अर्ज हे मुळ कागदपत्रांवरील माहितीच्या आधारे भरावी. स्कॅन केलेले रंगीत छायाचित्र, स्वाक्षरी, स्वयंघोषणा पत्र व स्वत:चे ओळखपत्र सोबत ठेवावीत. परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या उमेदवारांना एसएमएसच्या माध्यमातून अवगत केले जाणार असल्याने त्यांनी मोबाईल नंबर अचूक द्यावा. दोन्ही पेपरला प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्र एकाच ठिकाणी असेल अशा पद्धतीने निवड करावी. तसेच दोन्ही पेपरसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. ऑफलाईन स्वरूपात आलेला अर्ज स्विकारला जाणार नाही,

# रिलायन्सच्या 'वनतारा'ला सर्वोच्च न्यायालयाची 'क्लीन चिट'

नवी दिल्ली: प्राण्यांच्या खरेदी-विक्रीसंदर्भात कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप असलेल्या रिलायन्स फाऊंडेशनच्या 'वनतारा' केंद्राला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. एका विशेष तपास समितीने (डखढ) सादर केलेल्या अहवालानंतर सर्वोच्च न्यायालयाने 'वनतारा'ला 'क्लीन चिट' दिली असून, हे केंद्र पूर्णपणे नियमांनुसार चालवले जात असल्याचा निर्वाळा दिला आहे.

गुजरातच्या जामनगर येथील 'वनतारा झूओलॉजिकल रेस्क्यू अँड रिहॅबिलिटेशन सेंटर'वर दोन जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यात 'वनतारा'ने भारत आणि परदेशातून हत्तींची खरेदी करताना कायद्यांचे उल्लंघन केल्याचा आरोप करण्यात आला होता. काही माध्यमांनी, एनजीओ आणि वन्यप्राणी संघटनांनीही




यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. याचिकाकर्त्यांनी 'वनतारा'मधील हत्तींना त्यांच्या मूळ मालकांकडे परत देण्याची मागणीही केली होती.

या आरोपांची दखल घेत, सर्वोच्च न्यायालयाने २५ ऑगस्ट रोजी एका चार सदस्यीय विशेष तपास समितीची (डखढ) स्थापना केली होती. या समितीचे अध्यक्षपद सर्वोच्च न्यायालयातील एका माजी न्यायाधीशांनी भूषवले होते. या समितीने केलेल्या सखोल चौकशीनंतर, आपला अहवाल न्यायालयात सादर केला.

न्यायमूर्ती पंकज मिठाल आणि न्यायमूर्ती पी. बी. वराले यांच्या खंडपीठाने या अहवालाचे परीक्षण केले. खंडपीठाने 'वनतारा'ची प्रशंसा करत, ते कायद्यांचे पालन करत असल्याचे सांगितले. खंडपीठाने पुढे म्हटले की, या केंद्राला विनाकारण बदनाम करू नये.

'वनतारा'ने प्राण्यांची निगा राखण्यासाठी तज्ज्ञांच्या मदतीने मोठा खर्च केला आहे, असेही कोर्टाने यावेळी मान्य केले. अहवालाची संपूर्ण माहिती सार्वजनिक केल्यास अनावश्यक चर्चा वाढेल, असे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले. यावर, न्यायालयाने अहवाल स्वीकारला असून, या प्रकरणी पुढील कोणतेही वादविवाद होणार नाहीत, असे स्पष्ट केले.

वन्यप्राणी आणि त्यांच्या आरोग्याविषयी काम करणाऱ्या 'वनतारा'साठी हा एक मोठा विजय मानला जात आहे. या निर्णयानंतर आता त्यांच्या कामाला आणखी गती मिळणार असून, त्यांच्यावर लावण्यात आलेले आरोप पूर्णपणे निराधार असल्याचे सिद्ध झाले आहे.

## १ ऑक्टोबरपासून बदलणार तिकीट बुकिंगचे नियम

मुंबई: भारतीय रेल्वेने ऑनलाइन तिकीट बुकिंगच्या नियमांमध्ये एक मोठा बदल केला आहे, जो १ ऑक्टोबर २०२५ पासून लागू होणार आहे. हा बदल सामान्य आरक्षणासाठी असून, तो प्रवाशांना कन्फर्म तिकीट मिळवणे सोपे करेल आणि तिकीट दलालांवर नियंत्रण मिळवण्यास मदत करेल.

आधार-सत्यापित वापरकर्त्यांना प्राधान्य: १ ऑक्टोबरपासून, कोणत्याही ट्रेनसाठी ऑनलाइन बुकिंग सुरू झाल्यानंतर पहिल्या १५ मिनिटांत केवळ त्या प्रवाशांना तिकीट बुक करण्याची परवानगी असेल, ज्यांचे खठउढउ खाते आधार कार्डशी जोडलेले आणि सत्यापित आहे. सर्वांसाठी बुकिंग कधी सुरू होईल? ही १५ मिनिटांची वेळ संपल्यानंतर, सर्व सामान्य वापरकर्त्यांसाठी (ज्यांचे खाते आधारशी जोडलेले नाही) बुकिंग खुले होईल.

तिकीट दलालांवर नियंत्रण: या नियमाचा मुख्य उद्देश तिकीट दलालांना रोखणे आहे, जे बनावट आयडी आणि स्वयंचलित बॉट्सचा वापर करून बुकिंग सुरू होताच मोठ्या प्रमाणात तिकिटे बुक करतात. खऱ्या प्रवाशांना फायदा: यामुळे, ज्या प्रवाशांना खरोखरच प्रवासाची गरज आहे, त्यांना तिकीट मिळण्याची शक्यता वाढेल. विशेषतः दिवाळी, छठ पूजा, होळी आणि लग्नसराईच्या काळात, जेव्हा तिकिटांची मागणी खूप जास्त असते, तेव्हा हा नियम खूप उपयुक्त ठरेल.

या नवीन नियमाचा फायदा घेण्यासाठी आणि ऐनवेळी होणारी गैरसोय टाळण्यासाठी प्रवाशांनी त्यांचे खठउढउ खाते आधार कार्डशी लवकरच लिंक आणि सत्यापित करून घेणे आवश्यक आहे. माहितीचा संदर्भ: हा नियम तत्काळ तिकीट बुकिंगसाठी याआधीच लागू करण्यात आला होता आणि आता तो सामान्य आरक्षणासाठीही सुरू केला जात आहे. हे पाऊल रेल्वे तिकीट बुकिंगमध्ये पारदर्शकता आणण्याच्या दिशेने उचलले गेले आहे.

## रतन टाटांचे TCS कार्यालय बंद होणार! हजारो नोकऱ्या धोक्यात

भोपाळ: टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) ने मध्य प्रदेशातील भोपाळ येथील आपले कार्यालय १३ वर्षांनी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र यामुळे या कार्यालयात काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यावर आभाळ कोसळण्याची शक्यता आहे.

मुळात, TCS ने जून २०२५ मध्येच भोपाळ येथील कार्यालय बंद केले होते आणि आता तेथून हळूहळू मालमत्ता स्थलांतरित केली जात आहे. यासंदर्भात जेव्हा TCS च्या कर्मचाऱ्यांनी मध्य प्रदेशचे अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री जगदीश देवदा यांची भेट घेऊन परिस्थितीची माहिती दिली तेव्हा ही बातमी समोर आली.ढउड ने मध्यप्रदेश येथील भोपाळमध्ये असलेली आपली शाखा अचानक बंद केल्याची बातमी धक्का देणारी आहे. कारण यामुळे शहराच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. मुळात, TCS मध्य प्रदेशातून वार्षिक ५०० कोटी रुपयांची उलाढाल करते, तसेच सुमारे एक हजार कर्मचाऱ्यांच्या नोकरीची अनिश्चितता यामुळे भेडसावू शकते.

TCS चे भोपाळ शाखा बंद करण्यामागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, परंतु कर्मचाऱ्यांना हस्तांतरणाची माहिती दिली जात आहे. वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशचे अर्थमंत्री जगदीश देवरा यांनी TCS च्या CEO ला पत्र लिहून, भोपाळ येथील ढउड चे कार्यालय बंद न करण्याचे निवेदन केले आहे. त्यांनी या पत्रात असे म्हंटले आहे की, TCS सप्टेंबर २०२५ पर्यंत त्यांची भोपाळ शाखा बंद करण्याची योजना आखत आहे. मात्र, राज्य सरकारला TCS च्या अहमदाबाद, पाटणा, लखनौ, भुवनेश्वर आणि कोची प्रमाणेच त्यांची भोपाळ शाखादेखील कायम ठेवायची आहे. त्यांनी नमूद केले की या बंदमुळे राज्याला कोट्यवधी रुपयांचे महसूल नुकसान होऊ शकते आणि हजारो लोकांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. TCS कार्यालय बंद झाल्यामुळे केवळ नोकऱ्यांवरच परिणाम होणार नाही तर राज्याला आर्थिक धक्का बसू शकतो. मध्य प्रदेशातील उद्योग आणि वाणिज्यसाठी भोपाळ येथील TCS चे कार्यालय अत्यंत महत्त्वाचे आहे, आणि TCS च्या ५०० कोटी रुपयांच्या उलाढालीमुळे राज्याला मोठा कर महसूल मिळत आहे. भोपाळ कार्यालयात सुमारे १,००० कर्मचारी काम करत होते आणि आता त्यांना रोजगार अनिश्चिततेचा सामना करावा लागू शकतो. जर ढउड ने कार्यालय पूर्णपणे बंद केले तर या कर्मचाऱ्यांना नवीन नोकऱ्या शोधाव्या लागतील, ज्यामुळे आर्थिक संकट निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

## मांजराचे सहा दरवाजे उघडले

केज :- बीड जिल्ह्यातील धनेगाव ता. केज येथील मांजरा प्रकल्प भरला असल्याने मांजरा १५ सप्टेंबर रोजी रात्री ८:०० वाजता सहा दरवाजे उघडले आहेत. त्या पैकी दोन दरवाजे अर्ध्या मीटरने तर चार दरवाजे पाव मीटरने उघडले आहेत.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात आणि मांजरा नदी पात्र व पाणलोट क्षेत्रात दि. १४ सप्टेंबर आणि दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी पर्यंत जोरदार पडला आहे. त्यामुळे दि. १५ सप्टेंबर रोजी रात्री ८:०० वाजण्याच्या सुमारास धनेगावच्या मांजरा नदीवर असलेल्या मांजरा प्रकल्पाचे सहा वक्र दरवाजे उघडले आहेत. त्या पैकी गेट क्र १ व ६ हे दोन दरवाजे ०.५ मीटर म्हणजे अर्ध्या मीटरने तर गेट क्र. २, ३, ४ आणि ५ हे चार दरवाजे हे ०.२५ मीटर म्हणजे पाव मीटरने उघडले असल्याची माहिती मांजरा प्रकल्पाचे अधिकारी यांनी आहे.

## वक्फ सुधारणा कायद्यातील निवडक तरतुदींना स्थगिती, जिल्हाधिकाऱ्यांना नसेल निर्णय घेण्याचा अधिकार

नवी दिल्ली : संसदेत याच वर्षी मंजूर झालेल्या वक्फ सुधारणा कायद्यातील काही तरतुदींना सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने हंगामी निर्णय दिला. सलग तीन दिवस झालेल्या सुनावणीअंती २२ मे २०२५ रोजी निकाल राखून ठेवण्यात आला होता.

वक्फ सुधारणा कायद्यातील कलम ३ (१) (आर) मध्ये वक्फ मालमत्ता निर्माण करण्यासाठी संबंधित व्यक्तीने किमान पाच वर्षे इस्लाम धर्माचे अनुकरण केलेले असणे बंधनकारक करण्यात आले होते. या तरतुदीला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. जोपर्यंत देशातील राज्य सरकारे या संदर्भात सर्वंकष नियम तयार करत नाहीत, तोपर्यंत ही स्थगिती असणार आहे. पाच वर्षे इस्लामचे अनुकरण करण्यात आल्याचे कशा पद्धतीने निश्चित केले जाणार, याचे नियम राज्य सरकारांनी करायचे आहेत. हे नियम अंमलात येत नाही, तोपर्यंत ही स्थगिती राहणार आहे.

वक्फ सुधारणा कायद्यातील कलम ३ (सी) (२), ३ (सी) (३) आणि ३ (सी) (४) यांनाही स्थगिती देण्यात आली आहे. एखाद्या मालमत्तेवर अतिक्रमण झालेले नाही, असा अहवाल सरकारमधील नियुक्त केलेला अधिकारी देत नाही, तोपर्यंत संबंधित मालमत्ता वक्फ मालमत्ता म्हणून विचारात घेतली जाणार नाही, अशी तरतूद होती. त्याला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. तसेच संबंधित अधिकाऱ्याने ती मालमत्ता सरकारी मालमत्ता असल्याचा निर्णय दिल्यास, तशी नोंद सरकारी दस्तावेजांमध्ये केली जाईल, या तरतुदीलाही स्थगिती देण्यात आली आहे. सरकार वक्फ बोर्डाला यानंतर त्यांच्याकडील नोंदीमध्ये बदल करण्याचे आदेश देऊ शकते, यालाही स्थगिती देण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना वक्फ मालमत्तांसंदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार देणे हे आपल्याकडील सत्तेच्या विभागणीच्या तत्त्वाविरोधात आहे. कार्यकारी मंडळांतर्गत येणारे अधिकारी नागरिकांचे अधिकार निश्चित करू शकत नाहीत, असे सरन्यायाधीश म्हणाले. वक्फ बोर्डाचा मुख्य कार्यकारी अधिकारी ही व्यक्ती मुस्लिमच असावी, असे न्यायालयाने म्हटले आहे. केंद्रीय वक्फ कौन्सिलमध्ये ४ पेक्षा जास्त गैर मुस्लिम नसावेत आणि राज्य वक्फ बोर्डामध्ये ३ पेक्षा अधिक गैर मुस्लिम व्यक्ती नसाव्यात, असे न्यायालयाने म्हटले आहे. तसेच वक्फची नोंदणी बंधनकारक करण्याच्या तरतुदीमध्ये कोणताही हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला.

संसदेत याच वर्षी वक्फ सुधारणा कायदा २०२५ मंजूर झाला. हा कायदा लागू झाल्यावर त्याच्या घटनात्मक वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. या प्रकरणात सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने हंगामी निर्णय दिला. सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी १५ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेला निर्णय हा हंगामी आहे. हा तत्वाधारित निर्णय आहे. अंतिम निकालाआधी संबंधित पक्षकार या संदर्भात सविस्तरपणे आपला युक्तिवाद करू शकतील.

# एसआयटी अहवाल आदेशाचा भाग बनवला

# सर्वोच्च न्यायालयाने वनतारा यांच्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले

- सर्वोच्च न्यायालयाने आज विशेष तपास पथकाच्या (SIT) अहवालाच्या आधारे वनतारा विरुद्ध करण्यात आलेल्या सर्व आरोपांवर सुनावणी करून निर्णय दिला.
- **सर्वोच्च न्यायालय :** ''आम्ही अहवालाचा सारांश पाहिला आहे. त्यात नियामक अनुपालनाबाबत सखोल माहिती दिली आहे. हितधारकांनी आपले मतही मांडले आहे. प्राधिकरणांनी नियामक अनुपालनाबद्दल समाधान व्यक्त केले आहे इ. हा अहवाल आम्ही आदेशाचा भाग बनवणार आहोत.''
- **सर्वोच्च न्यायालय :** ''आता आमच्याकडे स्वतंत्र समितीचा अहवाल आहे, ज्यांना तज्ज्ञांची मदतदेखील मिळाली होती. आता सर्वजण शिफारशींनुसार पावले उचलण्यास मोकळे आहेत. वारंवार एकाच प्रश्नांची चौकशी करण्यास आम्ही आता परवानगी देणार नाही. आम्ही १० प्रश्न दिले होते आणि समितीने त्यांची उत्तरे दिली आहेत.''
- सर्वोच्च न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, ''समितीने सर्व मुद्यांचा सविस्तरपणे विचार केला आहे.'
- वनतारासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने टिप्पणी केली, ''आपल्या देशाचा अभिमान असतील अशा काही गोष्टी आहेत. या गोष्टींवर शंका उपस्थित करून गोंधळ निर्माण करता कामा नये. देशात काही चांगल्या गोष्टी घडू द्या. या सर्व चांगल्या गोष्टींबद्दल आपल्याला आनंद झाला पाहिजे.''
- **सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण :** ''जर हत्तीचे अधिग्रहण कायद्यानुसार झाले असेल, तर त्यात काय समस्या आहे? जर सर्व तरतुदींचे पालन झाले असेल तर त्यात अडचण नाही. अशा सामान्य आरोपांवर आपण जाऊ शकत नाही.''
- दोन याचिकांमध्ये वनतारा (ग्रीन्स झूलॉजिकल रेस्क्यू अँड रिहॅबिलिटेशन सेंटर व राधे कृष्णा टेम्पल एलिफंट वेल्फेअर ट्रस्ट) येथे बेकायदेशीरता व गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात आला होता.
- याआधी (२५.०८.२०२५) न्यायालयाला ठोस पुरावे आढळले नव्हते, परंतु विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सेवानिवृत्त न्यायमूर्ती व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली तथ्यशोधक चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (SIT) नेमले होते.

### एसआयटी तपास

- एसआयटीने अनेक भारतीय व विदेशी संस्था (CZA, CBI, ED, DRI, सीमाशुल्क, CITES संस्था इ.) यांच्यासोबत समन्वय साधला.
- नोंदी, प्रतिज्ञापत्रे, स्थळभेटी, तज्ज्ञांचे अभिप्राय व वैयक्तिक सुनावण्या यांची तपासणी केली.
- प्राण्यांचे अधिग्रहण, तस्करी, हेराफेरी, प्राणी कल्याण, संवर्धन, आर्थिक गैरव्यवहार व पर्यावरणीय मुद्दे यासंबंधी सर्व आरोपांची चौकशी केली.

### प्रमुख निष्कर्ष

**१. कोणतेही कायदेशीर उल्लंघन नाही :**

- वन्यजीव (संरक्षण) कायदा १९७२, प्राणी संग्रहालय नियम, CZA गाईडलाईन, सीमाशुल्क कायदा, FEMA, PMLA किंवा CITES यांचे कोणतेही उल्लंघन आढळले नाही. सर्व




अधिग्रहण आणि आयात योग्यरीत्या परवानगी आणि दस्तऐवजीकरण करण्यात आले होते.

**२. प्राणी कल्याण आणि सुविधा :**

- वनताराच्या सुविधा कल्याण, पालनपोषण आणि पशुवैद्यकीय काळजीच्या निर्धारित बेंचमार्कपेक्षा जास्त आहेत.
- मृत्युदर जागतिक प्राणिशास्त्रीय सरासरीशी जुळतात.
- ग्लोबल ह्युमन सोसायटीने 'ग्लोबल ह्युमन सर्टिफाईड टीएम सील ऑफ अप्रूवल'सह प्रमाणित.

**३. आर्थिक आरोप :**


- कार्बन क्रेडिट्स, पाणी किंवा मनी लॉण्ड्रिंगचा गैरवापर केल्याचे दावे निराधार आढळले.
- निधीचा कोणताही अनियमित प्रवाह किंवा तस्करीचे दुवे आढळले नाहीत.

**४. वारंवार तक्रारी :**

- न्यायालयाने नमूद केले की, वनतारा यांना वारंवार अशाच प्रकारचे आरोप सहन करावे लागले आहेत, परंतु सर्व आरोप निरर्थक आढळले आहेत.
- अशा धोक्याच्या याचिका सुरू ठेवणे हे प्रक्रियेचा गैरवापर असल्याचे म्हटले गेले.

**न्यायालयाचे निर्देश**

- **सीलबंद अहवाल :** अंतर्गत वापरासाठी संपूर्ण प्रत वनताराकडे.
- एसआयटी अहवालाचा सारांश गोपनीय नाही आणि न्यायालयाच्या आदेशाचा भाग आहे.
- वेळापत्रकात नमूद केलेल्या सर्व तक्रारी/विनंत्या बंद करा.
- त्याच आरोपांवरील पुढील तक्रारी कोणत्याही मंचावर विचारात घेतल्या जाणार नाहीत.
- वनतारा आणि अधिकाऱ्यांनी एसआयटीने सुचवलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी.
- बदनामीकारक प्रसिद्धीविरुद्ध वनतारा उपाय करू शकते.
- एसआयटी सदस्यांना (सेवारत आयआरएस अधिकारी वगळता) त्यांच्या कामासाठी मानधन देण्यात आले.



**निष्कर्ष :**
**सर्वोच्च न्यायालयाने एसआयटीचे निष्कर्ष पूर्णपणे स्वीकारले, खटले बंद केले आणि त्याच मुद्यांवर पुनरावृत्ती होणाऱ्या खटल्यांना मनाई केली तसेच वनताराच्या कल्याणकारी मानकांचे आणि संवर्धन प्रयत्नांचे कौतुक केले, तर निराधार आरोपांपासून सावधगिरी बाळगली.**

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. रामकृष्ण लोंढे निधन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ सप्टेंबर -**

कळंब तालुक्यातील ज्ञान, सेवा आणि समर्पणाने वैद्यकीय क्षेत्रात बाल रुग्ण सेवा तसेच कळंब शहराचा विकास व सामाजिक क्षेत्रातील कार्याच्या माध्यमातून सतत कार्य करणारे प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. रामकृष्ण लोंढे (वय ७४) यांचे मुंबई रेल्वे प्रवासा दरम्यान हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने १४ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार दि.१५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ कळंब येथील मांजराकाठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात मुलगा डॉ. अभिजीत लोंढे, बालरोग तज्ञ, मुलगी डॉ. संयोगिता लोंढे, सून डॉ. दिपाली लोंढे व नातवंडे असा परिवार आहे. कळंब शहराच्या विकास प्रश्नासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला. त्यांच्या निधनाने कळंब शहरात सर्वत्र व्यक्त होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते धनाजी गायकवाड यांचा सत्कार

**परंडा, दि.१५ सप्टेंबर -**

भाजपचे ज्येष्ठ नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर, आ. राणाजगजीतसिंह पाटील व जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाचे कार्यकर्ते तथा पिंपळवाडी ग्रा.प.चे विद्यमान सदस्य धनाजी गायकवाड यांची भाजपाच्या परंडा तालुका सरचिटणीसपदी निवड झाल्याने त्यांचा भाजपा कार्यालय परंडा येथे मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते फेटा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, विकास कुलकर्णी, सुखदेव टोम्पे, गणेश खरसडे, सारंग घोगरे, साहेबराव पाडुळे, अनिल पाटील आदि उपस्थित होते. धनाजी गायकवाड यांच्या निवडीमुळे परंडा तालुक्यात सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.



### तंटामुक्त समितीच्या उपाध्यक्षपदी अप्पू हिप्परगे यांची निवड

**मुरुम, दि.१५ सप्टेंबर -**

उमरगा तालुक्यातील येणेगुर येथील महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीच्या उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्यकारणी सदस्य अप्पू हिप्परगे यांची निवड करण्यात आली आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात हिप्परगे यांचे कार्य लोकपयोगी आहे. सार्वजनिक कार्यात लोकांचे प्रश्न सोडवणे, शासन दरबारी नागरी समस्या मांडणे असे अशी कामे जबाबदारीने करतात. त्यामुळे अश्या कार्यामुळे त्यांना तंटामुक्त गाव समितीच्या उपाध्यक्ष पदावर निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल उपसरपंच बाबासाहेब गायकवाड, राहुल बनसोडे, अमोल स्वामी, रमेश राठोड, सचिन दूधभाते, बाळासाहेब गायकवाड, मल्लिनाथ व्हनाळे, दयानंद गायकवाड, खुर्शीद येळीकर यांच्यासह अनेकांनी अप्पू हिप्परगे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

### देविदास पाठक यांना मराठवाडा रत्न पुरस्कार जाहीर

**धाराशिव, दि.१५ सप्टेंबर -**

मराठवाडा सेवक संघ, पुणे यांच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त देण्यात येणारे राज्यस्तरीय



मराठवाडा रत्न पुरस्कार जाहीर झाले असून यात धाराशिव येथील पत्रकार देविदास पाठक यांना मराठवाडा रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारांचे वितरण मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पुणे येथे यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड या ठिकाणी बुधवार, दि.१७ सप्टेंबर रोजी येथे आयोजित करण्यात आला आह, अशी माहिती मराठवाडा सेवक संघाचे संस्थापक अध्यक्ष दिनकर चौधरी आणि कार्याध्यक्ष दिनेश सास्तुरकर यांनी दिली आहे.



### इटकळ येथे श्री राम विजय ग्रंथाची उत्साहात सांगता

**इटकळ, दि.१५ सप्टेंबर -**

इटकळ येथे श्रीधर स्वामी लिखित श्री राम विजय ग्रंथ सांगता सोहळा मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात पार पडला. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रावण महिन्याच्या पहिल्या दिवशी ग्रंथ वाचन निरूपणास प्रारंभ करण्यात आला होता. संपूर्ण ४० अध्यायांचे वाचन पूर्ण झाल्यानंतर रविवार, दि.१४ सप्टेंबर रोजी सकाळी सांगता करण्यात आली. श्रीराम मंदिरापासून ग्रंथ दिंडीस प्रारंभ होऊन हनुमान नगर, मराई चौक, साठे चौक, स्वामी गल्ली, चावडी चौक मार्गे परत श्रीराम मंदिरात सांगता सोहळा झाला. रामकृष्ण हरी, जय श्रीरामच्या गजराने गावातील वातावरण भक्तिमय झाले होते. याप्रसंगी रामभक्त दिनेश सलगरे, नागनाथ स्वामी, गणेश बिराजदार, काशिनाथ पांढरे, रितेश माशाळकर, प्रकाश पांढरे, विश्वनाथ गायकवाड, चेतन गायकवाड, व्यंकट पाटील, दत्तात्रय शिंदे यांच्यासह महिला व युवक उपस्थित होते.

### शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाला प्रतिसाद

**तुळजापूर, दि.१५ सप्टेंबर -**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांचे विचार अंगीकारून चालणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यावर विश्वास ठेवून तुळजापूर तालुक्यात शिवसेनेच्या सदस्य नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. दि.१० ते १५ सप्टेंबर दरम्यान काक्रंबा व मंगरूळ जि.प. गावागावांत हे अभियान राबविण्यात आले. या अभियानातून जवळपास ५ हजार नवीन सदस्यांची नोंदणी करण्यात आली. अभियानाचे नेतृत्व अमरराजे कदम यांनी केले. यावेळी सुरज कोठावळे, खंडु कुंभार, विपीन खोपडे, लक्ष्मण माळी, संतोष दुधभाते आदींनी विशेष मेहनत घेतली.


# तुळजाभवानी नवरात्र महोत्सवास राज्याच्या प्रमुख महोत्सवाचा दर्जा

## पर्यटन विभागाच्या २०२५-२६ दिनदर्शिकेत तुळजापूरचा नवरात्र महोत्सव 'प्रमुख पर्यटन महोत्सवात' समाविष्ट...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ सप्टेंबर -**

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या तुळजापूरच्या श्री आई तुळजाभवानी देवी नवरात्र महोत्सवास राज्याच्या प्रमुख महोत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. धाराशिवचे जिल्हाधिकारी व मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांच्या प्रयत्नांमुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, राज्याच्या पर्यटन विभागाने सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील महोत्सव दिनदर्शिकेत तुळजाभवानी नवरात्र महोत्सवाचा समावेश केला आहे.

तुळजाभवानी देवीचे प्राचीन मंदिर देशभर प्रसिद्ध असून छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देण्यात आल्याची आख्यायिका



भाविकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. शारदीय नवरात्र महोत्सवाच्या काळात दरवर्षी सुमारे ५० लाख भाविक महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून दर्शनासाठी येतात.

या काळात तुळजापूर शहर धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक रंगांनी उजळून निघते.

पर्यटन विभागाच्या परिपत्रक क्रमांक टिडीएस २०२५/०६/प्र.क्र.९२/पर्यटन-३, दिनदर्शिकेमध्ये राज्यातील पर्यटनस्थळांची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसार-प्रसिद्धी करून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रमुख महोत्सव निवडले आहेत.

त्यामध्ये श्री आई तुळजाभवानी नवरात्र महोत्सवाचा समावेश करून त्याला प्रमुख पर्यटन महोत्सवाचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

या दहा दिवसीय महोत्सवात गोंधळी गीत, भजन, नृत्य, शास्त्रीय व लोकसंगीत असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

राष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम कलाकार तसेच स्थानिक




कलावंतांचा सहभाग या महोत्सवाचे वैशिष्ट्य ठरते.

तुळजापूर परिसरात नळदुर्ग किल्ला, तेर येथील संत गोरोबा काका मंदिर, आई येडेश्वरी मंदिर (येरमाळा, ता. कळंब), रामलिंग अभयारण्य (येडशी, ता धाराशिव), परंडा भुईकोट किल्ला अशी पर्यटनस्थळे असल्याने भाविक व पर्यटकांसाठी तुळजापूर आणि परिसर पर्यटनाच्या दृष्टीने आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

## चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची हत्या; पतीला जन्मपेठेची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ सप्टेंबर -**

पत्नीच्या हत्याप्रकरणी कळंब येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.के. राजेभोसले यांनी आरोपी विठ्ठल आप्पा संगापुरे (वय ५७, रा. रांजणी, ता. कळंब) यास जन्मठेप आणि ५ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावली. अतिरिक्त सरकारी वकील ॲड. अशिष कुलकर्णी यांनी मांडलेल्या युक्तीवादास न्यायालयाने मान्यता दिली.

घटनेविषयी अधिक माहिती अशी की, १ मार्च २०२२ रोजी रांजणी शिवारातील शेत गट क्रमांक १४० मधील पत्र्याच्या शेडमध्ये ही हत्या घडली. आरोपी विठ्ठल संगापुरे याने पत्नी मंगल हिच्या चारित्र्यावर संशय घेत



तिला बाहेर जाऊ देणे व इतरांशी बोलू न देणे सुरू केले होते. तिला सतत जीव मारण्याच्या धमक्याही देत होता. २८ फेब्रुवारी २०२२ च्या रात्री मोठा मुलगा बाळासाहेब शेडमध्ये झोपायला न गेल्याचा फायदा घेत आरोपीने पत्नी मंगल हिच्यावर झोपेत असताना कोयत्याने वार करून तिचा खून केला.

या प्रकरणी फिर्यादी परमेश्वर विठ्ठल संगापुरे यांच्या तक्रारीवरून शिराढोण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. एपीआय नेटके व उपविभागीय पोलिस अधिकारी एम. रमेश यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सरकारपक्षाने एकूण सात साक्षीदार तपासले. त्यामध्ये फिर्यादी परमेश्वर संगापुरे व मुलगा बाळासाहेब संगापुरे हे फितुर झाले.

तरी देखील शकेला दगडू शेख व हाजू इस्माईल शेख यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. तसेच वैद्यकीय अहवाल, परिस्थितीजन्य पुरावे आणि सरकारी वकिलांचा ठोस युक्तीवाद विचारात घेऊन न्यायालयाने आरोपीस जन्मठेप व दंडाची शिक्षा ठोठावली.

## सेरेंटिका व रिनिवल पवनचक्की कंपन्यांच्या विरोधात शेतकरी पुन्हा आक्रमक

### मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी आत्मदहनाचा इशारा...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१५ सप्टेंबर -**

वाशी तालुक्यातील शेतकऱ्यांचा पवनचक्की कंपन्यांविरोधातील संताप दिवसेंदिवस उफाळून येत आहे. सेरेंटिका व रिनिवल पावर कंपनीच्या गैरव्यवहार, फसवणूक आणि अन्यायकारक कारभाराविरोधात शेतकरी गेल्या अनेक महिन्यांपासून आंदोलन करत आहेत. तरीही शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झालेल्या नाहीत.

पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर व तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण करून शेतकऱ्यांनी आपली व्यथा मांडली होती. हजारो शेतकरी यात सहभागी झाले होते.

उपोषणावेळी प्रशासनाने लेखी आश्वासन देऊन लवकरच तोडगा काढला जाईल, असे नमूद केले होते.



**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या...**
शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय शेतात टॉवर उभारू नयेत. पिकांचे नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन पाळावे. जमिनीचा मावेजा असंबंधित व्यक्तींना देणे थांबवावे. टॉवर लाईनखालील झाडांचे पंचनामे करावेत. मावेज्याचे दिलेले चेक बाउन्स झाल्याची प्रकरणे त्वरित निकाली काढावीत. २२०/४०० केव्ही लाईनसाठी मोबदला समान पद्धतीने द्यावा. ठरलेला संपूर्ण मावेजा शेतकऱ्यांना देण्यात यावा.

मात्र आश्वासन दिल्यापासून बराच कालावधी उलटूनही शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नाही.

यामुळे शेतकरी आता आक्रमक झाले असून, १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय कार्यालय कळंब, तहसील कार्यालय वाशी तसेच पवनचक्की कंपनीच्या कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. शेतकऱ्यांचे निवेदन प्रशासनास देण्यात आले असून त्यावर शेकडो शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक दोन दिवसीय जिल्हा दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ सप्टेंबर -**

राज्याचे परिवहन मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे १६ व १७ सप्टेंबर रोजी दोन दिवसीय जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

१६ सप्टेंबर दुपारी १:१५ वा. शासकीय विश्रामगृह सोलापूर येथून तुळजापूरकडे प्रयाण. दुपारी २:१५ वाजता तुळजापूर येथे आगमन. शारदीय नवरात्र महोत्सव २०२५ अनुषंगाने विविध स्थळांची पाहणी व मंदिर संस्थान प्रशासकीय भवनात आढावा बैठक. सायंकाळी ५:३० वा. तुळजापूर येथून धाराशिवकडे प्रयाण. सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत शिवसेना पदाधिकाऱ्यांसोबत बैठक. मुक्काम शासकीय विश्रामगृह, धाराशिव. १७ सप्टेंबर सकाळी ८:२५ वा. धाराशिव शासकीय विश्रामगृहातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण. सकाळी ८:३५ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन. सकाळी ८:४५ वा. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिन कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १०.१० वा. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव येथे आगमन. उम्मीद निदान केंद्र व रक्त साठवण केंद्राचे उद्घाटन. सकाळी ११ वा. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ४५ मीटर उंच ध्वज उभारणी कार्यक्रमाचे भूमि पूजन. दुपारी १ वा. धाराशिवहून समृद्धी महामार्गाने ठाण्याकडे प्रयाण.

## पाचजन्य वाढदिवस उपक्रम आदर्श व प्रेरणादायी : शिल्पा करमरकर

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१५ सप्टेंबर -**

विविध क्षेत्रातील युवक विशिष्ट ध्येयाने एकत्र येऊन जन्मदिन सामाजिक उपक्रमाच्या रूपाने साजरा करतात, ही कल्पना प्रेरणादायी असून नव्या पिढीला आदर्श वाटचाल करण्यास प्रवृत्त करणारी आहे, असे गौरवोद्गार लातूरच्या अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांनी व्यक्त केले.

पाचजन्य सामाजिक वाढदिवस समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत भगीरथ कुलकर्णी गुरुजी होते.

करमरकर पुढे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांसोबत पालकांनाही योग्य मार्गदर्शन आवश्यक आहे. स्पर्धात्मक युगात मुलांना सुसंस्काराचे धडे देण्याची जबाबदारी पालक व शिक्षकांवर आहे. संस्कृती जपण्याचे कार्य महिलांच्या योगदानातूनच शक्य होते, असेही त्यांनी नमूद केले.




गौरी गणपती, वक्तृत्व स्पर्धा व सामान्य ज्ञान स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न...

यावेळी शिवाजी कांबळे, उद्योजक करबसप्पा धमुरे, डॉ. पंकज घुगे, सामाजिक कार्यकर्ते राजकुमार गाढवे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुहास कंदले यांचा जन्मदिन सामाजिक उपक्रम दिन म्हणून साजरा करण्यात आला.

ज्येष्ठ विचारवंत भगीरथ कुलकर्णी गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जन्मदिनाच्या निमित्ताने उचललेला हा अभिनव उपक्रम कौतुकास्पद आहे. तरुणांनी एकत्र येऊन समाजासाठी कार्य केले तर वेगळा आदर्श निर्माण होईल. आत्मविश्वास आणि योग्य दिशा असल्यास यश नक्कीच गवसते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी बाबुराव मुळे, शिवशंकर तिरगुळ, सचिन गुद्द, सुधीर ठाकूर, बसवेश्वर निसरगुंडे, अमोल कांबळे, इरफान खानापुरे, महादेव स्वामी, युवराज करपे, सचिन तोग्गी, लक्ष्मण नरे, राहुल घोडके यांनी परिश्रम घेतले

प्रास्ताविक अनिल घुगे यांनी केले, सूत्रसंचालन अमोल गुड व श्रद्धा दुपारगुडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. पंकज घुगे यांनी मानले.

## नळदुर्गमधील राष्ट्रीय महामार्ग खड्डेमय : जीव मुठीत घेऊन वाहनचालकांचा प्रवास



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ सप्टेंबर -**

नळदुर्ग शहरातून गेलेल्या राष्ट्रीय महामार्गावर नळदुर्ग बसस्थानक ते आलियाबाद पुलापर्यंत मधोमध मोठमोठे जीवघेणे खड्डे पडले असून, वाहनचालक व प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. संबंधित विभागाने तात्काळ खड्डे बुजवावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सध्या राष्ट्रीय महामार्गाचे वाहतूक बायपास मार्गे वळविण्यात आलेली असली तरी नळदुर्ग शहरातून गेलेला हा मार्गसुद्धा तितकाच महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र, आंध्र व कर्नाटक राज्यातील अनेक बस तसेच लोहगाव, नंदगाव, सिंदगाव, वागदरी, गुजनूर, शहापुर, गुळहळ्ळी, दहिटना या गावांची वाहतूक या रस्त्यावरूनच होत असते. मात्र, या महामार्गाची अवस्था खेडेगावांतील रस्त्यासारखी झाली आहे.

बसस्थानकाजवळ घाट उतरताना व आलियाबाद पुलावर पडलेले खड्डे अपघातांना आमंत्रण देत आहेत. अनेक युवकांनी या ठिकाणी जीव गमावला असूनही विभागाचे दुर्लक्ष कायम आहे. एवढेच नव्हे तर रस्त्याच्या दोन्ही बाजूला साचलेल्या प्रचंड घाणीमुळे दुचाकी घसरून अपघात होत आहेत. दुर्गंधीमुळे प्रवासी व नागरिक त्रस्त झाले आहेत.

नागरिकांचे म्हणणे आहे की, टोलवसुली होत असताना रस्त्यांची अशी दुर्दशा असणे ही अन्यायकारक बाब आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभागाने तातडीने दखल घेऊन खड्डे बुजवावेत.

अन्यथा हा रस्ता नळदुर्ग नगरपालिकेकडे वर्ग करून दुरुस्ती व देखभाल करण्याची जबाबदारी सोपवावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियंता दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ सप्टेंबर -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन विभागात 'अभियंता दिन' प्रोजेक्ट प्रदर्शन व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

स्पर्धांचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ. प्रशांत कोल्हे, प्रा. श्रीकांत अघोर, प्रा. वर्षा बोन्दर यांचा सत्कार करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## नवीन मोटो पॅड ६० निओ' च्या लाँचची घोषणा

मुंबई : मोटोरोला ही मोबाइल तंत्रज्ञानामधील जागतिक अग्रणी कंपनी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज भारतात नवीन मोटो पॅड ६० निओ' च्या लाँचची घोषणा केली, ज्यासह त्यांच्या परिसंस्था पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे. मनोरंजन, सर्जनशीलता व उत्पादकतेचे विनासायास संयोजन देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला हा टॅब्लेट एकमेव ११ इंच २.५के डिस्प्लेसोबत ९० हर्टझ रिफ्रेश रेटसह त्याच्या सेगमेंटमध्ये नवीन मापदंड स्थापित करतो. या टॅब्लेटसोबत लेखन, स्केलिंग व त्वरित सर्चसाठी बॉक्समध्ये मोटो पेन येतो. फक्त ४९० ग्रॅम वजन आणि ६.९ मिमी जाडी असलेला मोटो पॅड ६० निओ त्याच्या श्रेणीमधील वजनाने सर्वात हलका व सर्वात स्लिम ५जी -सुसज्ज टॅब्लेट देखील आहे, ज्यामुळे चालता-फिरता सहजपणे वापरता येतो. सहजपणे फाइल ट्रान्सफर, स्क्रिन शेअरिंग व क्रॉस डिवाईस नियंत्रणासाठी प्रगत स्मार्ट कनेक्ट वैशिष्ट्य आहे, तसेच या टॅब्लेटमध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी ६३०० ५ऋ प्रोसेसर आहे, ज्यामुळे मल्टीटास्किंग, स्ट्रिमिंग, गेमिंगसाठी सुलभ कार्यक्षमता देतो. या सर्व सुविधा प्रीमियम पॅन्टोन-निर्मित ब्राँझ ग्रीन डिझाइनमध्ये समाविष्ट आहेत.

## इपॉक एल्डर केअरचा विस्तार

पुणे : भारतातील सहाय्यक राहणीमान आणि डिमेंशिया सेवा देणारी आघाडीची कंपनी इपॉक एल्डर केअरने आज पुण्यातील उच्चभ्रू बालेवाडी भागात त्यांची नवीनतम सुविधा, इपॉक मोनेट हाऊस सुरू करण्याची घोषणा केली. महाराष्ट्रातील वाढत्या वृद्ध लोकसंख्येला प्रीमियम सहाय्यक राहणीमान आणि विशेष काळजी सेवा प्रदान करण्याच्या विस्तार धोरणात हे नवीन १० मजली, ३३,००० चौरस फूट संकुल एक महत्त्वाचा टप्पा आहे. सर्व्हे २२, हिस्सा क्रमांक ४/३, तालुका हवेली, बालेवाडी हाय स्ट्रीट, लक्ष्मण नगर, पंचशील बिझनेस पार्कच्या समोर स्थित, या नवीन संकुलात ७० रहिवाशांची क्षमता असलेल्या ५६ खोल्या आहेत. इपॉक मोनेट हाऊस मुंबई आणि पुण्यातील कुटुंबांना सेवा देण्यासाठी मोक्याच्या ठिकाणी आहे, एक्सप्रेसवेद्वारे बालेवाडीची मुंबईशी उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी आणि प्रीमियम वैद्यकीय पायाभूत सुविधांच्या जवळचा फायदा घेत आहे.

## विराज प्रोफाइल्सला ईईपीसी इंडिया नॅशनल अवॉर्ड - निर्यात क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मान

नवी दिल्ली : स्टेनलेस स्टील लाँग प्रॉडक्ट्स क्षेत्रातील अग्रणी विराज प्रोफाइल्स प्रा. लि. ला आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील उत्कृष्ट निर्यात कामगिरीबद्दल ईईपीसी इंडिया नॅशनल अवॉर्ड फॉर एक्सलन्स इन इंजिनिअरिंग एक्स्पोर्ट्स हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे झालेल्या ५६ व्या नॅशनल एक्स्पोर्ट एक्सलन्स अवॉर्ड्स सोहळ्यात भारताच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या. केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री श्री पीयूष गोयल यांनीही उपस्थित राहून देशाच्या निर्यात क्षमतेचे कौतुक केले. विराज प्रोफाइल्सच्यावतीने अध्यक्ष श्री सिद्धार्थ मोदी व सीए श्री राकेश अग्रवाल यांनी हा सन्मान स्वीकारला.या वेळी राष्ट्रपती महोदया यांनी भारताच्या अभियांत्रिकी निर्यात क्षेत्रातील झपाट्याने झालेल्या वाढीचे कौतुक केले, तर श्री पीयूष गोयल यांनी झिरो डिफेक्ट, झिरो इफेक्ट या ध्येयासह जगभर भारतातील दर्जेदार उत्पादने पोहोचावीत, असे प्रतिपादन केले.

## एआय-आधारित इन्व्हर्टर आणि भारत-रेडी सोलर रूफटॉप लाँच

नाशिक - शक्ती एनर्जी सोल्युशन्सचे सीईओ, श्री रामकृष्ण सतलुरीम्हणाले: शक्ती सोलर रूफटॉप हे उच्च दर्जाचे सोल्युशन्स असून, ते 'मेड इन भारत, मेड फॉर भारत' या तत्त्वज्ञानावर आधारित आहेत. ही प्रणालीखास भारतीय हवामानासाठी तयारकरण्यात आली आहे, ज्यामुळे उत्तम ऊर्जा उत्पादन, अधिक टिकाऊपणा आणि विषम हवामान परिस्थितीतही उत्कृष्ट कामगिरी बजावतात. अपडेटेड मॉनिटरिंग सिस्टिममुळे ग्राहक आता रिअल-टाइममध्ये ऊर्जा उत्पादन तपासू शकतील, ज्यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि स्मार्ट एनर्जी मॅनेजमेंट शक्य होईल.शक्ती पंप्सच्या विश्वासार्हतेमुळे, शक्ती एनर्जी सोल्युशन्स आता सौर ऊर्जा उद्योगात एक मोठा आणि विश्वासार्ह ब्रँड बनत आहे. हे ब्रँड सोलर पॅनेल, इन्व्हर्टर आणि मॉड्यूल माउंटिंग स्ट्रक्चर्स, अशा सर्व गोष्टी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देते.

## ९३% भारतीय क्रिप्टो नियमनाची मागणी करत आहेत: मुड्रेक्स सर्वेक्षणातून उघड

मुंबई : भारतातील आघाडीच्या क्रिप्टो गुंतवणूक प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या मुड्रेक्सने आज त्यांचे नवीनतम सर्वेक्षण भारत काय विचार करतो: क्रिप्टो नियमन, कर आकारणी आणि गुंतवणूक ट्रेंड प्रसिद्ध केले. विविध वयोगटातील, उत्पन्न पातळी, व्यवसाय आणि क्षेत्रांमधील ९,००० हून अधिक सहभागींच्या प्रतिसादांचा समावेश केला गेला. या अभ्यासात नियमन, कर आकारणी, प्रेरणा, अडथळे, अधिकाऱ्यांवरील विश्वास, राजकीय विचार आणि क्रिप्टो ज्ञानाचे स्रोत यावरील गुंतवणूकदारांचे विचार समाविष्ट आहेत. उद्योग अहवालांनुसार, भारत सलग तीन वर्षांपासून क्रिप्टो स्वीकारण्यात जगात आघाडीवर आहे. ही जलद वाढ प्रचंड संधी आणि नियामक स्पष्टतेची तातडीची गरज दोन्ही अधोरेखित करते. या पार्श्वभूमीवर, सर्वेक्षणात असे आढळून आले की ९३% प्रतिसादकर्ते क्रिप्टो नियमनाला समर्थन देतात, जे संरचित चौकटीची तीव्र मागणी अधोरेखित करते. यापैकी ५६% लोकांनी व्यापक नियमनाची मागणी केली, २४% लोकांनी कमी देखरेख पसंत केली आणि १३% लोकांनी कर आकारणीपुरते मर्यादित नियमन करण्याची मागणी केली. ५०% प्रतिसादकर्त्यांनी समर्पित क्रिप्टो नियामकाला पाठिंबा दर्शविला.

# अतिवृष्टीने लोहगावमध्ये शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान - घरात घुसले पाणी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १५ सप्टेंबर पैठण तालुक्यातील लोहगाव येथे शनिवारी दि १३ शनिवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीने पाऊस आणि पाझर तलाव फुटल्याने लोहगाव ते लामगव्हाण रस्त्यावरील गट नं.८५/८६ मधील शेताला एखाद्या मोठया तलावाचे स्वरूप प्राप्त झाले असून हे पाणी लोहगाव बाजार तळावरून ड्रेनेज व सखल भागातून येणारे पाणी सरळ लोहगाव येथील गट नं ८५/८६ मध्ये सरळ पाण्याचा प्रवाह घुसल्याने या शेतीला तलावाचे स्वरूप आले असून लोहगाव ते लामगव्हाण रस्ता व मध्यरात्री तोंडोळी रस्त्यावरील पाझर तलाव फुटल्याने या तलावातील पूर्ण पाणी वाहून डांगे वस्ती तसेच गणेश बोरुडे, मुख्तार पठाण,जावेद पठाण, फैसल पठाण, गजानन पुरी,रामनाथ डांगे याच्या घराला पावसाच्या पाण्याने वेढले पावसाने शेतीचे देखील मोठया प्रमाणात नुकसान झाले असून नागरी वसाहती देखील प्रभावित झाल्या असल्याचे चित्र पाहवयास मिळत आहे.

अतिवृष्टीने लोहगाव येथील पाझरतलाव फुटल्याने रहिवाशी व शेतीचे जवळपास १५० हेक्टरच्या पुढे शेतातील कपाशी, तूर, मका ऊस, मोसंबी या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती मिळताच तहसीलदार ज्योती पवार,मंडळ अधिकारी राजाराम ससाणे, तलाठी मारोती दंडे, प्रभारी ग्रामपंचायत अधिकारी सुहास पाटील यांच्या सह जि प सिंचन व मृद संधारण महामंडळाचे अधिकारी यांनी संयुक्त पाहणी केली.

## एकलव्य भिल्ल संघटनेचा उपविभागीय कार्यालयावर आदिवासी अधिकारांसाठी महामोर्चा

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.१५ सप्टेंबर:- आदिवासी हक्कांसाठी एकलव्य भिल्ल समाज संघटनेच्या वतीने कन्नड येथे आदिवासी अधिकार बचाव महामोर्चा काढण्यात आला. कन्नड एकलव्य चौक (बायपास) येथून मोठ्या संख्येने आदिवासी बांधव सहभागी झाले असून संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष सुमित्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर सोमवारी दुपारी ३ वाजता पोहोचला.



मोर्चात सहभागी झालेल्या नागरिकांनी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी संतोष गोरड आणि तहसीलदार विद्यालरण कडवकर यांना सादर केले. निवेदनात अनुसूची ५ व ६ चे संपूर्ण महाराष्ट्रभर अंमलबजावणी करावी, आदिवासी समाजात गैरजातींचा समावेश होऊ नये, सरकारी व वनजमिनीवर राहणाऱ्या आदिवासींना घर बांधण्याची परवानगी द्यावी, तसेच कन्नड तालुक्यातील भिल्ल समाजासाठी जात प्रमाणपत्र, आधारकार्ड, रेशनकार्ड यांसारख्या आवश्यक कागदपत्रांसाठी कॅम्प आयोजित करून सेवा घरपोच उपलब्ध करावी, अशा मागण्यांचा समावेश करण्यात आला.

याशिवाय भिल्ल समाजासाठी स्वतंत्र दफनभूमी नावावर करून देण्याचीही मागणी करण्यात आली. निवेदनावर सुमित्राताई पवार, ॲड. सूर्यकांत पवार, कन्नड तालुका अध्यक्ष आकाश काळे, किशोर पवार, दिपालीताई बांडे, दिलीप ऋषी, नाना मोरे, राज मोरे, राम गायकवाड, उमेश सोनवणे आणि ज्ञानेश्वर गोलवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

मोर्चादरम्यान शासन व लोकप्रतिनिधींच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा या मोर्चाचा उद्देश असून निवेदनावर सकारात्मक तोडगा काढण्याचा प्रयत्न प्रशासनाने करण्याची तयारी दर्शवली.

## श्री. अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी विठ्ठल राठोड,तर व्हाईस चेअरमनपदी दुर्गादास बलांडे संदीप चौधरी मानद सचिवपदी बिनविरोध



सोयगाव,दि.१५ सप्टेंबर - श्री.अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्थेचे सोयगावच्या चेअरमन,व्हा.चेअरमन,मानद सचिव या पदांची निवड अध्याशी अधिकारी व्हि.यु.लकवाल (सहाय्यक निबंधक, सिल्लोड),विलास घुगे,(सहकार अधिकारी सोयगाव)व दिलीप रावणे यांच्या नियंत्रणात करण्यात आली.यावेळी विठ्ठल राठोड यांची चेअरमन पदी,तर दुर्गादास बलांडे तालुका अध्यक्ष प्राथमिक शिक्षक संघ तालुका सोयगाव यांची पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमन पदी निवड करण्यात आली व संदीप चौधरी यांची मानद सचिव पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.या निवडी प्रसंगी प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी तसेच सहकार पॅनलचे पॅनल प्रमुख दिवाकर चोपडे,अनिल निकम,भास्कर चौधरी,राजेश जंजाळ,गोपाल चौधरी,जनार्धन साबळे,संजय चौधरी,रविंद्र साळुंके यांची प्रमुख उपस्थिती होती. सहकार पॅनलचे संचालक कृष्णा पाटील,संतोष वाघ,पंकज रगडे,शकूर शेख,संदिप सोनवणे,रघुनाथ काटोले,तसेच संस्थेचे कर्मचारी प्रमोद जाधव,रमेश वामने हे उपस्थित होते.भास्कर चौधरी व दिवाकर चोपडे पतसंस्थेचे माजी संचालक,चेअरमन यांनी चेअरमन,व्हॉइस चेअरमन व मानद सचिव यांच्या निवडीबद्दल अभिनंदन करून सभासद व पतसंस्था हितासाठी काम करण्यास शुभेच्छा दिल्या.

## शिवतांडा येथे ८५ ऊसतोड मजुरांच्या कुटुंबांना प्रमाणपत्रांचे वाटप



तभा वृतसेवा

कन्नड :दि.१५ सप्टेंबर - तालुक्यातील शिवतांडा येथे तांडा विकास गट आणि ग्रामपंचायत यांच्या वतीने दि. ८ रोजी ८५ ऊसतोड मजुरांच्या कुटुंबांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी जि.प. शाळेचे मुख्याध्यापक राजपूत यांनी भूषवले.

यावेळी टीडीजी सदस्य मंडळ, तेजस्विनी महिला बचत गट, चिल्ड्रन्स पार्लमेंट, ग्रामपंचायत सदस्य आणि तांड्यातील ऊसतोड मजुरांच्या कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राजपूत म्हणाले की ऊसतोड मजुरांचे कुटुंब अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत संपूर्ण महाराष्ट्रासह महाराष्ट्राबाहेरही ऊसतोडीचे काम करीत असल्याचे सांगितले. अपघाती मृत्यू, सर्पदंश, हृदयविकार, वीज पडणे अशा नैसर्गिक दुर्घटनांमुळे त्यांचे जीवन अधिकच संकटग्रस्त होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यामुळे गोपीनाथ मुंडे महामंडळ, दुर्घटना लाभ, सानुग्रह लाभ, विवाहासाठी अनुदान, शैक्षणिक अनुदान अशा योजनांचा लाभ नोंदणीअभावी मिळत नाही. नागपाडा नेबरहूड संस्थेच्या जनजागृती कार्यक्रमांमुळे हक्क व अधिकार याविषयी जागरूकता निर्माण झाली. त्याचा परिणाम म्हणून टीडीजी आणि तांड्यातील रहिवाशांनी ऊसतोड मजुरांच्या कुटुंबांना हक्काचा आधार मिळवून देण्यासाठी एकच प्रयत्न केले आहे .यावेळी टीडीजी सदस्य, नागपाडा संस्थेची टीम, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य यांचे उपस्थित होते.आभार इंदल चव्हाण यांनी मानले.

# हैद्राबाद गॅझेटीयर नुसार बंजारा समाजाला एसटी आरक्षण शक्य नाही

### आमदार भीमराव केराम यांची ठाम भूमिका

किनवट : महाराष्ट्रात सध्या मराठा समाजाच्या आरक्षण आंदोलनानंतर लागू करण्यात आलेल्या हैद्राबाद गॅझेटीयर नुसार बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात सामावून घेण्याची मागणी जोर धरु लागली आहे, व राज्यातील काही आमदार-खासदारांनी त्यांच्या स्थानिक मतदारसंघातील बंजारा समाजाच्या मतदानाची आकडेवारी हैद्राबाद स्टेट गॅझेटिअर (१९२०) चा दाखला देत बंजारा समाजाला अनुसुचित जमातीत आरक्षण देण्याचे पत्र दिले आहे.

मात्र या पार्श्वभूमीवर किनवटचे आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना (ता.१२) निवेदन देऊन आदिवासी समाजाची बाजू ठामपणे मांडली आहे. व बंजारा समाजाला आदिवासी आरक्षण देणे हे संविधानच्या मुळ गाभ्या विरोधातील कृत्य असुन बंजारा हे भटके आहेत, त्यांना भौगोलिक विभाग नाही. त्यांचा मुळ उगम अफगानिस्थान या देशातुन असल्याचे रेकॉर्ड नुसार वेळोवेळी सिध्द झाले आहे.



राज्यातील आमदार व खासदार देत असलेल्या निवेदनात दोनच मुद्दे असुन ते दोन्ही मुद्दे कशा प्रकारे बंजारा समाजाला लागु होत नाही ते आ. केराम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना दिलेल्या निवेदनात स्पष्टीकरण दिले आहेत. त्यात ऐतिहासिक घटनाक्रमाचा व बाबीचा संदर्भात देत आ. केराम यांनी स्पष्ट भुमिका मांडली आहे.

आमदार भीमराव केराम यांची मागणी

आ. केराम यांनी मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की - सामान्य प्रशासन विभागाला १० सप्टेंबर २०२५ रोजी वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्याचे आदेश दिले आहेत. या अनुषंगाने राज्य आदिवासी सल्लागार परिषदेची बैठक मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बोलावावी. सर्व आदिवासी आमदार-खासदारांना वस्तुस्थिती समजावून सांगावी व गैरसमज दूर करावेत. मूळ आदिवासींच्या हक्कांवर गदा येणार नाही, याची खबरदारी घ्यावी. अशी मागणी निवेदनात केली आहे. हैद्राबाद गॅझेटिअरच्या आधारे बंजारा समाजाला एसटी आरक्षण देणे ही वस्तुस्थिती व संविधान दोन्हीच्या विरोधातील बाब आहे. मूळ आदिवासींना न्याय मिळावा, अन्याय होऊ नये. यासाठी राज्य सरकारने ठोस व स्पष्ट निर्णय घ्यावा.

१९५६ व १९७६ मधील गोंधळ

१९५६ मध्ये आंध्रप्रदेशातील खासदारांनी बंजारा समाजाला एसटीमध्ये घेण्याचा प्रस्ताव मांडला, पण तो फेटाळला गेला. त्यानंतरही चुकून त्यांचा तात्पुरता समावेश झाला व लगेचच आदेशाने वगळण्यात आले. १९७६ च्या संविधान सुधारणा आदेशानंतर मात्र तेलंगणात सुगाली/लंबाडा समाजाला डढ' मध्ये स्थान मिळाले. ही प्रक्रिया संविधानातील मूळ निकष न पाळता झाली असून याबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित आहे, असेही केराम यांनी नमूद केले. तसेच १९७९ मध्ये महाराष्ट्र शासनाने बंजारा व धनगर समाजांला डढ मध्ये समावेश करण्याचा प्रस्ताव केंद्राला पाठवला होता. पण केंद्राने परत पाठवून दिला व निकष तपासण्यास सांगितले.

# रिअल इस्टेटपासून लाईफस्टाईलपर्यंत: खिंवसरा ग्रुपचा हॉस्पिटॅलिटी, एंटरटेनमेंट व फॅशनमध्ये प्रवेश, छत्रपती संभाजीनगरच्या विकासकथेकरिता राजकुमार रावची साथ

छत्रपती संभाजीनगर : १९५८ मध्ये स्थापन झालेला खिंवसरा ग्रुप, जो रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी आणि एंटरटेनमेंटमध्ये एक प्रतिष्ठित नाव आहे, त्याने विकासाच्या नव्या पर्वाची घोषणा केली आहे. ग्रुपने The Machan (लोणावळा), Ananta Spa and Resorts (जयपूर), Clarks Collection (IHCL) आणि Clarks Resorts (IHCL) सारख्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बँड्ससोबत प्री-लीज्ड हॉस्पिटॅलिटी गुंतवणूक संधी सादर केल्या आहेत. यासोबतच ग्रुपने आपला नवा लाइफस्टाईल बँड Pixiepie, मनोरंजन बँड Allora Cinemas, Regus - को-वर्किंग ऑफिस स्पेस जाहीर केला आहे आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते अभिनेते राजकुमार रावयांना बँड ॲम्बेसेडर म्हणून स्वागत केले आहे. हे सर्व पाऊल उचलणे खिंवसरा ग्रुपच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगरला हॉस्पिटॅलिटी, पर्यटन आणि भविष्यातील उद्योग जसे की ऑटोमोबाईल्स व एती यांचे केंद्र म्हणून बळकट करण्याकडे एक पाऊल आहे.

प्री-लीज्ड गुंतवणूक: Smarter, Safer Growth

खिंवसरा ग्रुपच्या प्री-लीज्ड हॉस्पिटॅलिटी प्रॉपर्टीज ही गुंतवणुकीची एक अभिनव पद्धत आहे. या संधींमुळे गुंतवणूकदारांना स्थिर आणि निश्चित परतावा मिळतो, तसेच स्वतःच्या मालकीच्या प्रॉपर्टीवर वाढत्या हॉस्पिटॅलिटी क्षेत्राचा भाग होण्याची संधीही मिळते.

प्री-लीज्ड गुंतवणूक का?

स्थिर ROI

नामांकित हॉस्पिटॅलिटी पार्टनर्ससोबत जोखीम कमी

दीर्घकालीन मालमत्ता मूल्यवृद्धी

अतिरिक्त लाइफस्टाईल सुविधा व मेंबरशिप रिवॉर्ड्स जसे की Complimentary Stays, Wedding Jackpot आणि Special Discounts

राजकुमार राव - ब्रँड ॲम्बेसेडर

खिंवसरा ग्रुपने आपल्या नव्या उपक्रमांसाठी ख्यातनाम अभिनेता राजकुमार रावयांना ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून जोडले आहे. त्यांच्या विश्वासार्हतेमुळे आणि प्रामाणिकपणामुळे ते खिंवसरा ग्रुपच्या विश्वास, दूरदृष्टी आणि प्रगतीया तत्त्वज्ञानाशी उत्तम प्रकारे जुळतात.

श्री. रविंद्र खिंवसरा, मॅनेजिंग डायरेक्टर, म्हणाले: राजकुमार राव यांचा प्रवास विश्वासार्हता, महत्त्वाकांक्षा आणि दूरदृष्टी यांचे प्रतिबिंब आहे. आम्हाला त्यांना आमच्या नव्या पर्वाचा चेहरा बनवताना अभिमान वाटतो.




श्री. सत्यजित खिंवसरा, डायरेक्टर न्यू बिझनेस डेव्हलपमेंट, म्हणाले: राजकुमार राव आमच्यासोबत आल्यामुळे आमच्या दृष्टीला एक विश्वासार्ह आणि संबंधित ओळख मिळाली आहे. आमची ऑफरिंग्ज या फक्त गुंतवणुकीपेक्षा अधिक आहेत त्या एका प्रगतिशील जीवनशैलीचा भाग आहेत.

हॉस्पिटॅलिटी, पर्यटन आणि उद्योगाचे भविष्य

युनेस्को वारसा स्थळे अजिंठा आणि वेरूळ असलेले छत्रपती संभाजीनगर पर्यटन व हॉस्पिटॅलिटीसाठी जलद गतीने उभरत आहे. शहरात ऑटोमोबाईल्स आणि एत इंडस्ट्रीसुद्धा वेगाने विकसित होत आहेत, ज्यामुळे गुंतवणूकदारांसाठी अधिक मजबूत परतावा आणि संधी उपलब्ध होत आहेत. खिंवसरा ग्रुपच्या गुंतवणुका या प्रादेशिक विकासाशी जोडलेल्या आहेत.

हॉस्पिटॅलिटी ब्रँड भागीदारी

खिंवसरा ग्रुप Machan, Ananta Spa Resorts, Clarks Collection (IHCL) आणि Clarks Resorts (IHCl) सारख्या नामांकित हॉस्पिटॅलिटी ब्रँड्ससोबत हातमिळवणी करत आहे. या सहकार्यामुळे जागतिक दर्जाचे अनुभव छत्रपती संभाजीनगरमध्ये उपलब्ध होणार आहेत लक्झरी स्टे, वेलनेस रिसॉर्ट्स, बिझनेस हॉटेल्स आणि डेस्टिनेशन वेडिंग्सपर्यंत. या संधी गुंतवणूकदारांना ROI-आधारित आकर्षक पर्याय उपलब्ध करून देणार आहेत.

पिक्सीपाय: आनंदी पालकत्वाचा ब्रँड

खिंवसरा ग्रुपने झळुळशळिश हा प्रीमियम बेबी क्लोदिंग ब्रँड जाहीर केला आहे, ज्याची स्थापना सिद्धी खिंवसरा यांनी केली आहे. Parenting should be fun and full of pride या विचारातून जन्मलेला हा ब्रँड खेळकर अस्वल मॅस्कॉटसोबत आरामदायी, आकर्षक आणि आनंदी बेबीवेअर सादर करतो.

सिद्धी खिंवसरा, संस्थापक म्हणाल्या: Pixiepie मुलांच्या जीवनातील प्रत्येक टप्पा आनंद आणि स्टाइलने साजरा करतो, आणि पालकत्व एक आनंदी प्रवास बनवतो.

अल्लोरा सिनेमाज

खिंवसरा ग्रुपने Allora Cinemas ची घोषणा केली आहे जिथे सिनेमा जादू आणि आलिशान जीवनशैली एकत्र येतात. -श्र्श्रीर उळपशारी हे इमर्सिव्ह स्टोरीटेलिंग, उत्कृष्ट डायनिंग आणि आधुनिक जागांचा सुंदर संगम आहे. हे मल्टिप्लेक्स प्रेक्षकांच्या अनुभवाला नवी उंची देणार आहे.

रेगस: को-वर्किंग ऑफिस स्पेस

खिंवसरा ग्रुपने Regus, या अग्रगण्य जागतिक को-वर्किंग बँडसोबत भागीदारी केली आहे. या सहकार्यामुळे स्टार्टअप्स, उद्योजक आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी अत्याधुनिक, तयार-टू-युज आणि प्रीमियम ऑफिस स्पेस उपलब्ध होणार आहेत. Regus च्या आंतरराष्ट्रीय अनुभवासोबत आणि खिंवसरा ग्रुपच्या शहरी विकासाच्या दृष्टीकोनातून ही भागीदारी नवोन्मेष, सहकार्य आणि आर्थिक वाढ यांना प्रोत्साहन देईल.

खिंवसरा ग्रुप बद्दल

१९५८ मध्ये स्थापन झालेला खिंवसरा ग्रुप रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी, एंटरटेनमेंट आणि क्लोदिंग क्षेत्रात शहराचे स्कायलाईन घडवत आला आहे. त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये प्रीमियम रेसिडेन्सेस, प्लॉटेड लेआउट्स, कमर्शियल स्पेसेस तसेच आघाडीच्या हॉस्पिटॅलिटी ब्रँड्ससोबतच्या भागीदाऱ्या समाविष्ट आहेत.

हॉस्पिटॅलिटीमध्ये ग्रुप Te Amo Fine Dine. Te Amo Bistro आणि Te Amo Casual Dining सारख्या प्रकल्पांचे संचालन करतो, जे उत्कृष्ट शाकाहारी भोजनासाठी प्रसिद्ध आहेत. एंटरटेनमेंट क्षेत्रात, Khinvasara Cineplex चे विस्तार आणि Allora Cinemas मध्ये रूपांतर सुरु आहे.

आपल्या नवीन उपक्रमांसह - Hospitality -ssociations, Pixiepie आणि Allora Cinemas - खिंवसरा ग्रुपने वित्तीय वाढ, सामाजिक परिणाम आणि जीवनशैलीमधील मूल्य यांचा संगम पुढे नेण्याची परंपरा कायम ठेवली आहे.

## अग्रलेख...

# सप्तबहिणींचा बंधुराया

मिझोरमवासीयांसाठी १३ सप्टेंबर हा ऐतिहासिक दिवस ठरला आहे. कारण, ७८ वर्षांनंतर मिझोरम रेल्वेने उर्वरित भारताशी जोडले गेले आहे. आज आपल्या देशाला असे कर्मवीर पंतप्रधान लाभले आहेत, जे एखाद्या प्रकल्पाची पायाभरणी करतात आणि लोकार्पणही. बैराबी-सैरांग हा ५१ किलोमीटर लांबीचा रेल्वेमार्ग सर्वांत खडतर असा मार्ग आहे. जवळपास १३ किलोमीटर लांबीचे ४८ सुरुंग, ५५ मोठे तर ८५ लहान पूल या मार्गावर उभारण्यात आले आहेत. कुरूंग नदीवरील पूल तर १०४ मीटर म्हणजे कुतुबमिनारपेक्षाही ४२ मीटरने उंच आहे. सैरांग हे स्टेशन मिझोरमची राजधान ऐझवालपासून २२ किलोमीटर अंतरावर आहे. सैरांग हे आता मिझोरम राज्याचे रेल गेटवे म्हणून नकाशावर आले आहे तसेच रेल्वेने जुळणारे ऐझवाल हे पूर्वोत्तर राज्यांतील चौथे राजधानीचे शहर ठरले आहे. गुवाहाटी, इटानगर आणि अगरतळा ही राजधानीची शहरे रेल्वेमार्गाने जोडली गेली आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, २९ नोव्हेंबर २०१४ रोजी पंतप्रधान मोदी यांच्या हस्तेच बैराबी-सैरांग रेल्वेमार्गाचा शिलान्यास झाला होता आणि ११ वर्षांनंतर त्यांच्याच हस्ते हा मार्ग जनतेला समर्पित करण्यात आला. यापूर्वी नागरिकांना बैराबी येथून ऐझवालला जाण्यासाठी रस्तामार्गे जवळपास सात तास लागत असे, जे आता रेल्वेने अवघ्या दोन तासांवर आले आहे. आणखी एक योगायोग म्हणजे, १९९९ मध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वातील रालोआचे सरकार असतानाच बैराबी-सैरांग रेल्वेमार्ग उभारणीवर चर्चा झाली होती तसेच पाहणीही करण्यात आली. त्यानंतर २००६ मध्ये संपुआ सरकार असताना पुन्हा पाहणी करून २००८ मध्ये रेल्वेमार्गाला मंजुरी देण्यात आली. त्यानंतर जवळपास पाच वर्षे काहीच हालचाली केल्या नाहीत. अखेर जेव्हा नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले, तेव्हा प्रत्यक्ष कामाला प्रारंभ झाला. याचा अर्थ एकच की, पंतप्रधान मोदी हे केवळ एखाद्या प्रकल्पाचे उद्घाटन करीत नाहीत, तर त्याचे लोकार्पणही करतात.

पूर्वेकडील आसाम, मिझोरम, त्रिपुरा, नागालॅण्ड, मणिपूर, मेघालय आणि अरुणाचल प्रदेश हा पूर्वोत्तर भूभाग सात बहिणींचा प्रदेश म्हणून प्रसिद्ध आहेत. नैसर्गिक संपत्तीने विपूल अशा या सात राज्यांकडे स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने साफ दुर्लक्ष केले. जवळपास ६० वर्षे हा भूभाग हिंसाचाराने धुमसत राहिला. येथील जनता स्वतःला भारतीय मानतच नव्हती. कारण, राजधानी दिल्लीतील तत्कालीन सत्ताधीशांनी या सात बहिणींकडे कधीच लक्ष दिले नाही. उपेक्षा पदरी पडल्याने येथील जनतेच्या मनात उर्वरित भारताविषयी आपुलकीची भावनाच नव्हती. आसाम, मिझोरम आणि नागालॅण्डमध्ये तर भारतापासून वेगळे होण्यासाठी बंडखोरांनी संघर्ष उभारले होते. आसामातील युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उल्फा), नॅशनल डेमोक्रॅटिक फ्रंट ऑफ बोडोलॅण्ड, कामतपूर लिबरेशन ऑर्गनायझेशन या बंडखोर संघटनांनी आसामात मोठा रक्तपात घडविला. मणिपूरमधील पीपल्स लिबरेशन आर्मी, युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट, मेघालयातील गारो नॅशनल लिबरेशन आर्मी, त्रिपुरातील ऑल त्रिपुरा टायगर फोर्स, नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा आणि नागालॅण्डमधील द नॅशनल सोशॅलिस्ट कौन्सिल ऑफ नागालॅण्ड आदी दहशतवादी आणि बंडखोर संघटनांनी पूर्वोत्तर भारतात प्रचंड धुमाकूळ घातला होता. भारतीय जवान आणि निमलष्करी दलांवर दररोज हल्ले होत होते. विरोधी गटातील नागरिकांचे अपहरण, मादक पदार्थांची तस्करी खुलेआम होत असे. भारताच्या अन्य भागातून माल घेऊन जाणारे ट्रक दिवसाढवळ्या लुटले जायचे. अफूची शेती बेकायदेशीरपणे केली जात असे. या अराजकतेचा फायदा धर्मप्रसारकांनी घेतला. मूळ आदिवासी आणि हिंदूंचे मोठे प्रमाणात धर्मांतर करण्यात आले. त्रिपुरा आणि आसाम सोडले तर उर्वरित पाच राज्यांमध्ये हिंदू समाज अल्पसंख्यक झाला आहे. तीन दशकांपूर्वी मणिपूर हिंदुबहुल राज्य होते, पण धर्मांतरामुळे हिंदू अल्पसंख्यक झाला. २०११ च्या आकडेवारीनुसार, हिंदू मिझोरममध्ये २.७५ टक्के, नागालॅण्डमध्ये ८.७५, मेघालयात ११.५३, अरुणाचलमध्ये २९.०४ तर मणिपूरमध्ये ४१.०४ टक्केच उरला आहे. आता जनगणना होऊन १४ वर्षे उलटली. नवी जनगणना पुढे आल्यानंतर हिंदूंची संख्या आणखी घटल्याचे समोर आल्यास आश्चर्य वाटायला नको.

पूर्वोत्तर भारतात हिंदू अल्पसंख्यक होणे हे काँग्रेसचे पाप आहे. स्वातंत्र्यानंतर या सातही राज्यांकडे प्रचंड दुर्लक्ष करण्यात आले. दक्षिणेतील राज्ये आणि हिंदीबहुल राज्यांच्या विकासाकडे जसे लक्ष देण्यात आले, तसे सात बहिणींकडे मुळीच लक्ष दिले नाही. रेल्वे, वीज, रस्ते, विमानसेवा, शैक्षणिक संस्था, पाणीपुरवठा यासारख्या पायाभूत सुविधांची निर्मिती केली नाही. याचा परिणाम असा झाला की, येथील जनतेला उर्वरित भारताविषयी आपुलकी आणि आपलेपण राहिले नाही. चीन, म्यानमारच्या सीमा भिडलेल्या असल्याने माओवाद फोफावला. हिंसक कारवाया आणि भारतीय जवानांवर हल्ले करून बंडखोर आणि दहशतवादी बिनदिक्कतपणे म्यानमारमध्ये लपून बसत असे. पण, केंद्रात मोदींचे सरकार येताच सर्वप्रथम बंडखोर आणि दहशतवाद्यांच्या मुसक्या आवळणे सुरू केले. स्वतंत्र महानागालॅण्डसाठी हिंसक कारवाया करणारी नॅशनल सोशॅलिस्ट कौन्सिल ऑफ नागालॅण्ड-के ही बंडखोर संघटना म्यानमारमधून कारवाया करीत होती. या संघटनेचा बीमोड करण्यासाठी भारताने ९ जून २०१५ रोजी म्यानमारमध्ये घुसून सर्जिकल स्ट्राईक केला. यात बंडखोरांचे अड्डे नष्ट करीत ४० पेक्षा जास्त बंडखोरांना ठार केले. भारताने केलेल्या या हल्ल्याचा परिणाम असा झाला की, ही संघटना मुळापासून उखडली गेली. मैतेई समुदायाचा समावेश एसटी प्रवर्गात करण्याचा निर्णय गुवाहाटी हायकोर्टाने २०२३ मध्ये दिल्यानंतर मणिपूरमध्ये कुकी आणि मैतेई समुदायांत हिंसाचार उफाळला. जवळपास दोन वर्षे हा संघर्ष सुरू होता. परंतु, दोन्ही समुदायांनी शांततेचे धोरण स्वीकारल्यानंतर परिस्थिती निवळत चालली आहे.

पंतप्रधान मोदी यांनी मणिपूरचा दौरा करीत हिंसाचाराने विस्थापित झालेल्या कुकी आणि मैतेई समुदायाच्या नागरिकांशी थेट संवाद साधला. पुढच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी शांतता हाच एकमेव मार्ग असून, दोन्ही समुदायांना शांततेचे आव्हान केले. पंतप्रधान मणिपूरमध्ये का गेले नाहीत, अशी ओरड करणाऱ्या विरोधी पक्षांसाठी ही चपराक होती. कारण, मणिपूरमध्ये पंतप्रधान मोदींचे नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा हातात तिरंगा ध्वज घेत भारत माता की जयचे नारे देत प्रचंड स्वागत केले. मोदींना कुकीबहुल भाग असलेल्या चुराचांदपूर येथे हेलिकाप्टरने जायचे होते. पण, खराब हवामानामुळे हेलिकाप्टरचे उड्डाण करणे शक्य नव्हते. अशावेळी पंतप्रधान दौरा रद्द करू शकले असते किंवा आभासी पद्धतीने संवाद साधू शकले असते. पण, त्यांनी तसे न करता भर पावसात रस्तामार्गे चुराचांदपूर येथे जाणे पसंत केले. हिंसाचारामुळे नागरिकांची मने दुखावली होती. पंतप्रधानांनी कुकी आणि मैतेई समुदायांच्या विस्थापित झालेल्या नागरिकांशी अगदी जवळून संवाद साधत, त्यांची कैफीयत जाणून घेत त्यांच्या जखमी मनावर फुंकर घातली. हिंसाचारात ज्यांची घरे नष्ट झाली, अशा सात हजार कुटुंबांसाठी नवे घर बांधून देण्याचा संकल्प पंतप्रधानांनी सोडला आहे. पूर्वोत्तर भारतातील दोन दिवसांच्या दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांनी मिझोरम, मणिपूर आणि आसाम या तीन राज्यांसाठी हजारो कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी केली, तर काही प्रकल्पांचे लोकार्पण केले. जेवढी विकासकामे काँग्रेसच्या ६० वर्षांच्या काळात झाली नाहीत, तेवढी कामे गेल्या ११ वर्षांमध्ये झाली आहेत. साधे उदाहरण द्यायचे झाल्यास ब्रह्मपुत्रा नदीवर गेल्या सहा दशकांत अवघे तीन पूल बांधण्यात आले, पण गेल्या ११ वर्षांमध्ये सहा पूल बांधण्यात आले. त्यामुळे पूर्वोत्तर भारतात विकासाचे इंजिन वेगाने धावत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपात सात बहिणींचा बंधू त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे.

## प्रासंगिक

हरदीप एस. पुरी, केंद्रीय मंत्री

### पडझडीतून नव्या भरारीच्या दिशेने

# पंतप्रधान नरेंद्र मोदी देताहेत् शहरी भारताला नवा आकार



रोम काही एका दिवसात निर्माण झालेले नव्हते, त्याचप्रमाणे जरी आज भारताची आपल्या शहरांकडून प्रचंड अपेक्षा असली तरी, नव्या शहरांचा भारतही (न्यू अर्बन इंडिया) एका दिवसात उभा करता येणार नाही. खरे तर आपण थोडा विचार करायला हवा आणि आजवर किती मोठी मजल मारली आहे, हे समजून घ्यायला हवे. खरे तर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक दशके भारताच्या शहरी प्रदेशांना दुय्यम महत्त्व दिले गेले होते. खरे तर त्यावेळी नेहरूंचा कल हा सोव्हिएतच्या शैलीप्रमाणे केंद्रीकरण करण्याकडेच होता आणि त्यातूनच शास्त्री भवन आणि उद्योग भवन यासारख्या इमारती उभ्या राहिल्या. दखल घ्यावी, असा भाग म्हणजे १९९०च्या दशकातच या इमारतींची पडझड सुरू झाली होती आणि महत्त्वाचे म्हणजे त्या सेवांचे नाही, तर नोकरशाहीचे स्मारक बनल्या होत्या.

२०१०पर्यंत दिल्लीच्या मध्यवर्ती भागाचे स्वरुप खूपच निराशाजनक होते. खड्ड्यांनी व्यापलेले रस्ते, जुन्या आणि गळक्या सरकारी इमारती आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रालगचे कायम वाहतुकीच्या खोळंब्यात अडकलेले रस्ते. या सगळ्याच्या जोडीला महामार्गांची उणीव, अगदी मोजक्याच शहरांपुरती मर्यादित असलेली मेट्रो रेल्वे सेवा, नागरी पायाभूत सुविधांची ठळकपणे जाणवावी इतकी झालेली पडझड अशी अवस्था होती. एका अर्थाने जागतिक नेतृत्व करण्याची आकांक्षा बाळगून असलेल्या आपल्या देशाची राजधानी केवळ दुर्लक्षाचे प्रतीक बनून राहिली होती. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही दशा आणि दिशाच बदलली. त्यांनी शहरांना राष्ट्रीय विकास कार्यक्रमपत्रिकेच्या केंद्रस्थानी आणले, त्यांनी शहरांच्या व्यवस्थापनाला ओझे न मानता विकासाचे इंजिन आणि अभिमानाची प्रतीके मानली. आज भारतात सर्वत्र हे परिवर्तन दिसून येते आहे.

हे बदल आपल्याला संबंधित आकडेवारीवरूनही समजून घेता येतील. २००४ ते २०१४ या कालावधी केंद्र सरकारने भारतातील शहरी क्षेत्रातील केलेली एकूण गुंतवणूक सुमारे १.५७ लाख कोटी रुपये होती. २०१४ पासून मात्र हा आकडा वाढून जवळपास २८.५ लाख कोटी रुपये झाला आहे. म्हणजे तब्बल सोळापट वाढ झाली आहे. दुसरीकडे एकट्या २०२५- २६च्या अर्थसंकल्पात गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाकरिता ९६ हजार ७७७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे आणि यापैकी एक तृतीयांश तरतूद ही मेट्रो रेल्वे सेवेसाठी तर एक चतुर्थांश तरतूद ही घरांसाठी आहे. अशा प्रकारची अभूतपूर्व आर्थिक वचनबद्धता स्वतंत्र भारतात यापूर्वी कधीही दिसून आली नव्हती आणि त्यामुळेच आता कधी नव्हे इतक्या वेगाने भारतातील शहरी क्षेत्राच्या परिदृश्याची वीण नव्याने वीणली जात आहे. दुसरीकडे, भारताची व्यापक आर्थिक आणि डिजिटल प्रगतीमुळेही या गतीला अधिकचे बळ मिळू लागले आहे. आज सुमारे ४.२ ट्रिलियन डॉलर्ससह आपण जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनलो आहोत. महत्त्वाचे म्हणजे, डिजिटल व्यवस्था या आता आपल्या रोजच्या जगण्याचा भाग बनल्या आहेत. यूपीआयवरील आर्थिक व्यवहारांनी तर एका महिन्याच्या कालावधीतच २० अब्ज व्यवहारांचा टप्पा पार केला आहे, यासोबतच युपीआयच्या माध्यमातून दरमहा २४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याचे व्यवहार केले जात आहेत. आजमितीला ९० कोटी पेक्षा जास्त भारतीय ऑनलाईन सुविधांचा वापर करू लागले आहेत. इतकेच नाही तर, जनधन-आधार आणि मोबाईल या त्रिसूत्रीचा आधार बनलेल्या ५६ कोटी जन धन खात्यांच्या माध्यमातून अनुदानाचे आर्थिक लाभ थेट नागरिकांच्या खात्यात पारदर्शकपणे हस्तांतरीत केले जात आहेत.

भारतात प्रत्यक्ष जमिनीवर घडून आलेल्या परिवर्तनाचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे इथली मेट्रो रेल्वे सेवा क्रांती. २०१४ मध्ये भारतात केवळ पाच शहरांमध्येच सुमारे २४८ किमी लांबीची मेट्रो रेल्वे सेवा कार्यरत होती. मात्र, आजमितीला इथे २३ पेक्षा जास्त शहरांमध्ये १ हजार किमीपेक्षा जास्त लांबवर मेट्रो रेल्वेचे जाळे विस्तारले असून, दररोज सुमारे एक कोटींपेक्षा जास्त प्रवासी मेट्रोने प्रवास करतात. पुणे आणि नागपूरपासून ते सुरत आणि आग्रापर्यंत अनेक नवीन कॉरिडॉरचे प्रत्यक्ष बांधकामही सुरू झाले असून, ज्यामुळे शहरांमधला प्रवास जलद, स्वच्छ आणि सुरक्षित झाला आहे. आपण हे समजून घ्यायला हवे की, हे काही केवळ पोलाद आणि सिमेंटचे बांधकाम नाही, तर यामुळे प्रवासाच्या वेळेची बचत झाली आहे, हवा अधिक स्वच्छ झाली आहे आणि परतावा म्हणून नागरिकांना त्यांच्या हाती कोट्यवधी तासांची उत्पादकता मिळाली आहे.

भारताची पहिली प्रादेशिक वेगवान वाहतूक प्रणाली ठरलेली दिल्ली-मेरठ आरआरटीएस (नमो भारत) याआधीच प्रमुख विभागांमध्ये सुरू झाली असून, लवकरच ती पूर्णपणे कार्यान्वित होण्याच्या टप्प्यावर पोहोचली आहे. यामुळे प्रवासाला लागणारा वेळही तासभराच्या आत येऊ शकणार आहे.

द्रुतगती महामार्गांमुळेही शहरांमधील प्रवासाचे चित्र पूर्णतः बदलले असल्याचे आपण अनुभवत आहोत. दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग, बंगळुरू-म्हैसूर द्रुतगती महामार्ग, दिल्ली-मेरठ नियंत्रित कॉरिडॉर आणि मुंबई सागरी मार्ग अशा सुविधांमुळे भारताच्या शहरांमधील स्थानिक रस्त्यांवरून होणारी लांब पल्ल्याची वाहतूक आता शहरांबाहेरून वळवली जाऊ लागल्याने प्रवासाचे अंतरही कमी होऊ लागले आहे आणि त्याचवेळी शहरांतल्या हवेची गुणवत्ताही सुधारू लागली आहे. देशातील सर्वात लांब सागरी पूल असलेल्या मुंबईतील अटल सेतूमुळे आता हे बेटासदृश्य शहर मुख्य भूभागाशी सुलभतेने जोडले गेले आहे. भारताचा पहिला बुलेट ट्रेन कॉरिडॉर असलेल्या मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे उभारणीचे कामही वेगाने पुढे सरकत असून, हा भारताच्या पश्चिम भागाच्या विकासाचा मार्ग बनेल यात शंकाच नाही.

खरे तर, सर्वसमावेशकतेचे तत्त्व हे केंद्र सरकारच्या प्रत्येक कामाच्या केंद्रस्थानी असलेले तत्त्व. म्हणूनच तर प्रधानमंत्री स्वनिधी योजनेच्या माध्यमातून ६८ लाखांहून अधिक पथ विक्रेत्यांना तारण-मुक्त कर्जाची सुविधा मिळाली तसेच त्यांचे डिजिटल सक्षमीकरण होऊ शकले. या योजनेमुळे छोट्या उद्योजकांना आपल्या उपजीविका पुन्हा सुरू करण्यासाठी आणि औपचारिक अर्थव्यवस्थेत पाय रोवण्यासाठी मोठी मदत केली. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (शहरी) १२० लाखांहून अधिक घरांना मंजुरी देण्यात आली असून, यापैकी सुमारे ९४ लाख घरे याआधीच बांधून पूर्ण झाली आहेत. त्यामुळे कधीकाळी झोपडपट्ट्यांमध्ये राहणारी लाखो कुटुंबे आता सुरक्षितपणे पक्क्या घरांमध्ये स्थिरावली आहेत. ही काही निव्वळ आकडेवारी नाही, तर हे बदललेल्या जीवनमानाची आणि पूर्ण झालेल्या आकांक्षांची प्रतिके आहेत.

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# संस्कारक्षम कुटुंब हवेच!

नुकतेच आपला शेजारी देश नेपाळमध्ये युवावर्गाचे मोठे आंदोलन भडकले. रस्त्यावर उतरून त्यांनी केवळ जाळपोळच केली नाही, तर देशातील सत्ताही उलथून टाकली. एवढेच काय तर, उपपंतप्रधानांसह मोठमोठ्या मंत्र्यांना अक्षरशः पळवून-पळवून मारले. तेथील संसद पेटवली, शासकीय इमारती नष्ट केल्या. नेपाळमधील सर्वांत लक्झरी हॉटेलही पेटवून दिले. या सर्वांमागे नेमके कारण काय, याचा शोध घेतला असता लक्षात आले की, जेन झेड म्हणजे जनरेशन झेडच्या मनात सत्ताधारी नेते, सेलिब्रिटी, त्यांचे कुटुंब यांच्याविषयी प्रचंड संताप होता. हे सर्व अतिशय आलिशान जीवन जगत आहेत, याची या युवा वर्गाच्या मनात चीड निर्माण झाली. आपल्याला प्रतिकूलतेत जगावे लागत असताना, अस्थिरतेत राहावे लागत असताना हे सर्व शाही जीवन जगतातच कसे, असा त्यांचा संताप होता. त्यासाठी समाज माध्यमांवर आलेली बंदी हे तात्कालीक कारण ठरले.

हा उद्रेक पाहता वाटले की, या सर्वांच्या घरच्यांना आता नेमके काय वाटत असेल? आपले मूल रस्त्यावर उतरून सर्रास गुन्हे करीत सुटलेय्, हे पाहून या कुटुंबातील सदस्यांच्या भावना नेमक्या काय असतील? त्यांच्या भावना काहीही असल्या तरी शेवटी सगळे मुद्दे संस्कारांवर येऊन थांबतात. आयुष्यातील संघर्ष कोणालाच चुकलेला नाही. अगदी धीरूभाई अंबानीदेखील प्रचंड संघर्ष करूनच वर आले. अशी असंख्य उदाहरणे आहेत. पण मग संघर्ष करताना संयमाने राहिले पाहिजे, हे तत्त्व या ग्रेट लोकांनी पाळले. नेपाळमधील 'जेन झी'ला हा संघर्ष असह्य का झाला? सरळ उत्तर आहे की, त्यांचे संस्कार कमी पडले.



जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संस्कारांचाच खेळ दिसतो. यश असो किंवा अपयश ते हाताळण्यासाठी संस्कारच हवे असतात. दोन्ही गोष्टी संयमानेच हाताळायच्या असतात. संयमाचे संस्कार कुटुंबातून व्हावे लागतात म्हणून आज संस्कारक्षम कुटुंब गरजेचे आहे. मग ती कोणत्याही देशातील पिढी असो...

कुटुंब केवळ निवाऱ्यासाठी नाही, तर सर्व प्रकारच्या आधारासाठी गरजेचं असतं. सर्वांत मोठी गरज ही मानसिक आणि भावनिक आधाराची असते. हा आधार एक मजबूत कुटुंबच देऊ शकते. ही बाब आपल्या पूर्वजांना चांगली ठावूक होती. त्यामुळे भारतात बऱ्याच प्रमाणात कुटुंब व्यवस्था टिकून राहिली आहे. नोकरीच्या निमित्ताने बाहेरगावी किंवा बाहेरदेशात राहणाऱ्यांना विभक्त कुटुंबात राहावे लागते. पण, असे असूनही ते सणवार किंवा कार्यप्रसंगाच्या निमित्ताने आपल्या मूळ कुटुंबाशी जोडलेले राहतात. हीच भारतीय संस्कृतीची ताकद आहे. यामुळेच आपले बाहेर देशात असणारे कुटुंबीय सर्व सणवार परक्या देशातही पारंपरिक पद्धतीने साजरे करतात आणि आपली संस्कृती तिथेही जपतात. त्यातील अनेकजण सांगतात की, देशापासून, कुटुंबापासून दूर गेल्यानंतर आपल्या सर्व गोष्टींविषयी जास्त आपुलकी आणि ओढ वाटते. हेच आपले संस्कार आहेत आणि हीच आपल्या संस्कारांची ताकद आहे, जी आपल्या देशातील पूर्वापार चालत आलेल्या कुटुंब व्यवस्थेने दिली आहे. नेपाळसारख्या देशात कदाचित याचा अभाव असल्याने तेथील नवी पिढी अशी बेफाम आणि बेदरकार वागू लागली असावी.

भारतातही प्रतिकूलता आहेच, बेरोजगारीही आहे. मात्र, आजही आपल्या कौटुंबिक मूल्यांनी असंख्य लोकांना डगमगण्यापासून वाचवले आहे. अनेक समाज असे आहेत, जिथे तेथील लोक एखाद्याला स्थिरस्थावर करण्यासाठी एक होतात आणि पुरेसे पाठबळ देतात. हीच भावना राष्ट्रीयत्वाच्या दृष्टिकोनातून राहिली तर कदाचित एखाद्या बुडत्याला आधार देण्यासाठी कोणीही पुढे सरसावेल. जोपर्यंत एखाद्या गरजूच्या पाठीशी समाजातील किमान एकजण जरी उभा असेल, तोवर तो समाज तुटू शकत नाही. अर्थात, यासाठी संपूर्ण समाज माझे कुटुंब ही भावना निर्माण व्हायला हवी. हीच मानवीय दृष्टी नव्या पिढीला घडवण्यासाठी आवश्यक आहे. चांगले जीवन जगण्यासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता आहे, हे सांगणारे कौटुंबिक वातावरण समाजात निर्माण झाले पाहिजे. असे झाले तर कोणत्याही देशातील युवा पिढी अशी बेताल वागणार नाही. भविष्याचे चित्र आशादायीच राहील.

७७५५९३८८२२

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# भारतासाठी एक सुवर्णसंधी!

पं. जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असतानाची घटना. भारतीय विदेश सेवेची परीक्षा उत्तीर्ण होऊन, प्रशिक्षण वगैरे झाल्यावर या तुकडीचे सारे युवा अधिकारी सरकारी सेवेत रुजू होणार होते. त्या काळात भारतीय विदेश सेवा ही आयएएस वा आयपीएसपेक्षाही श्रेष्ठ मानली जात होती. नव्या अधिकाऱ्यांची विदेशात नियुक्ती झाली होती. परदेशी रवाना होण्यापूर्वी पंतप्रधानांसोबत त्यांचे चहापान आयोजिण्यात आले होते. चहापानाचा कार्यक्रम सुरू झाला. नेहरूंनी या साऱ्या अधिकाऱ्यांना विचारले, बर्लिन क्रायसेस म्हणजे बर्लिन समस्येबाबत तुम्हास काय माहिती आहे? नेहरूंच्या या प्रश्नावर सारे अधिकारी चूप. एकाही अधिकाऱ्यास या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. मग, नेहरूंनी त्यांना बर्लिन समस्या म्हणजे काय ते समजावून सांगितले.

**बर्लिनचे विभाजन** : बर्लिन शहराचे पूर्व बर्लिन व पश्चिम बर्लिन असे विभाजन करण्यात आले. केवळ बर्लिन शहराचे विभाजन झाले नाही तर एकप्रकारे जगाचे विभाजन झाले. जागतिक सत्ताकारणात अमेरिका व तत्कालीन सोवियत युनियन असे दोन गट तयार झाले. पण, काही देशांना कोणत्याही एका गटात सामील होणे मान्य नव्हते. त्यावर तोडगा म्हणून अलिप्त राष्ट्र गट तयार झाला. युगोस्लाव्हियाचे मार्शल टिटो, इंडोनेशियाचे सुकार्णो, भारताचे पंतप्रधान नेहरू आणि इजिप्तचे नासेर या चार नेत्यांच्या पुढाकाराने अलिप्त राष्ट्र चळवळ सुरू झाली आणि १२१ देश या गटात सामील झाले. अलिप्त चळवळ हे एक प्रभावी व्यासपीठ तयार झाले होते.

**आणि चळवळ कोसळली** : मात्र १९९१ च्या सुमारास सोवियत युनियनचे विखंडन सुरू झाले. यातून १५ राज्ये फुटून बाहेर पडली. सोवियत युनियन संपुष्टात आले. जगाच्या राजकारणात त्याचा दबदबा संपुष्टात आला. केवळ अमेरिका नावाची महासत्ता कायम राहिली आणि अलिप्त चळवळ संपुष्टात आली. जगात दोन महासत्ताच शिल्लक राहिल्या नाहीत तर मग अलिप्तवादाचा मुद्दा कुठे राहिला? ही चळवळ संदर्भहीन झाली. मागील अनेक वर्षांत या चळवळीचे संमेलन वगैरे झाल्याचेही ऐकिवात नाही.

**पृथ्वी गोल आहे** : पृथ्वी गोल आहे, तसेच जगाचे राजकरणही गोल आहे काय? कारण जग पुन्हा एकदा त्याच स्थितीत जाऊन पोहोचले आहे. जगाच्या राजकारणात पुन्हा दोन गट तयार झाले आहेत. एकीकडे अमेरिका व युरोप तर दुसरीकडे रशिया व चीन. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील संघटनेने नाव होते नाटो. नॉर्थ एटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन आणि सोवियत युनियनच्या गोटात होती वार्सा करारावर सह्या करणारी अल्बानिया, बल्गेरिया, पोलंड, हंगेरी यासारखी राष्ट्रे. आता यात थोडा बदल झाला आहे. एकीकडे नाटोची ताकद वाढली आहे तर वार्सा कराराची जागा शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनने घेतली आहे. सोवियत युनियनची जागा चीनने घेतली आहे.

**भारतासाठी सुवर्णसंधी** : जगाच्या राजकारणाची ही बदलती स्थिती भारतासाठी एक सुवर्णसंधी आहे. अमेरिका व चीन या दोन्ही गटांत जाण्यास अनुत्सुक असणाऱ्या राष्ट्रांना आपल्याकडे खेचीत त्यांचे नेतृत्व करण्याची संधी भारताला चालून आली आहे. भारताने ही संधी गमावता कामा नये. जगातील अनेक देशांना अमेरिका व चीन यांचे मांडलिक होणे मान्य नाही. त्यांच्यासाठी भारत हा नेता होऊ शकतो.

**चीनचे सामर्थ्य** : चीनच्या आंतरराष्ट्रीय व्यूहरचनेत आता एक बदल झाला असल्याचे दिसते. सोवियत युनियन व अमेरिका ज्याप्रमाणे आपल्या लष्करी सामर्थ्याचे दर्शन वा प्रदर्शन जगाला दाखवीत होते, चीनने ते आजवर केले नव्हते. आपली आर्थिक शक्ती वाढविण्यावर त्याचा भर होता. मात्र, दुसऱ्या महायुद्धास ८० वर्षे पूर्ण झाल्याचे निमित्त करून चीनने आपल्या लष्करी सामर्थ्याचे दर्शन जगाला घडविले. लष्करी क्षेत्रात चीनने मोठी झेप घेतली आहे असे यावरून दिसते. यानिमित्ताने चीनने जगातील काही देशांना निमंत्रित केले होते.

**फक्त २६ देशांची हजेरी** : फक्त २६ देशांनी या कार्यक्रमात हजेरी लावली. आणि हे सारे देश हुकूमशाही असणारे होते. दहशतवादाला पाठिंबा देणारे आहेत. मग तो उत्तर कोरिया असो, इराण असो वा पाकिस्तान. असे देश चीनच्या नादी लागले आहेत. पाकिस्तान, इराण, उत्तर कोरिया या तीन देशांनी जणू जगास वेठीस धरले आहे. या तिन्ही देशांजवळ आण्विक ताकद आहे. इराणला अद्याप अणुबॉम्बसाठी लागणारे ९० टक्के शुद्ध युरेनियम तयार करता आले नाही. मात्र, त्या देशाने युरेनियम ६० टक्के शुद्ध करण्याची क्षमता आत्मसात केली आहे. हे तिन्ही देश जगाला केव्हाही आण्विक युद्धाच्या खाईत लोटू शकतात. पाकिस्तानच्या फिल्ड मार्शलने काही दिवसांपूर्वी केलेले भाषण त्या संभाव्य धोक्याची कल्पना देणारे आहे.

**नाटोच्या मर्यादा** : दुसरीकडे अमेरिकेच्या पुढाकाराने युरोपच्या संरक्षणासाठी स्थापन करण्यात आलेल्या नाटोच्या मर्यादा आहेत. एकूण ३२ देश नाटोचे सदस्य असले तरी त्यात आता वाढ होण्याची शक्यता नाही. युक्रेन युद्धानंतर नाटो देशांनी आपल्या संरक्षण खर्चात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे चीन-रशिया गटातील २६ देश आणि अमेरिकेच्या नाटो गटातील ३२ देश असे जवळपास ६० देश दोन गटांत विभाजित झाले असले तरी जगातील १९५ देशांपैकी १३०-३५ देश कोणत्याही गटात सामील झालेले नाहीत. अलिप्त असणाऱ्या गटात १२० देश यापूर्वीही होते व आजही हे देश कोणत्याही गटात सामील झालेले नाहीत. मात्र, त्यांना नेतृत्व देण्यास कुणी समोर येण्यास तयार नाही ही खरी शोकांतिका आहे.

**मुस्लिम गट** : जगात ५७ मुस्लिम देश आहेत. यातील बहुतेक देश अमेरिकेच्या विरोधात आहेत. मात्र ते चीन-रशियाच्या गोटात जाण्यास तयार नाहीत. कारण या दोन्ही देशांबद्दल त्यांच्या मनात एक भीती आहे. यातील फक्त इराण चीनच्या गोटात सामील झाला आहे. मात्र हा देश शिया मुस्लिमांचा असल्याने सुन्नी मुस्लिम देशांचा त्याला विरोध आहे. केवळ इस्लामच्या नावाखाली ते इराणला पाठिंबा देत असतात. आता तर कतारची राजधानी दोहावर इस्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर मुस्लिम देश अमेरिकेच्या आणखी विरोधात गेले आहेत. भारताबाबत या देशांना फार विरोध नाही. अनेक मुस्लिम देशांशी भारताचे चांगले संबंध राहिले आहेत.

**भारतावर जबाबदारी** : एकीकडे आज जग कधी नव्हते एवढे असुरक्षित झाले आहे. तिसऱ्या महायुद्धाची जणू रंगीत तालीम युक्रेनमध्ये सुरू आहे. तिसरे महायुद्ध अधिकृतपणे घोषित झाले नसले तरी ते अप्रत्यक्षपणे सुरू झाले आहे. अशा स्थितीत जगाला अधिक सुरक्षित करण्याची जबाबदारी भारतासारख्या काही देशांवर राहणार आहे. अमेरिका आणि चीन यांच्यात दुभंगलेले जग अनेक देशांना मान्य नाही. या देशांचा नेता कोण? भारत यांचा स्वाभाविक नेता होऊ शकतो. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या भारताचा हा एक स्वाभाविक अधिकार मानला जाईल.

**ऐतिहासिक संधी** : एक म्हण आहे, संधी एकदाच तुमचा दरवाजा ठोठावत असते. भारतासाठी नेमकी ही स्थिती तयार होत आहे. प्रश्न आहे भारत किती लवकर ही संधी आपल्या हाती घेतो याचा. भारतासाठी हा एक ऐतिहासिक क्षण राहणार आहे.

## वाचक पत्रे

### राष्ट्रीय अभियंता दिन...

अभियंता दिन दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी भारतात साजरा केला जातो. हा दिवस भारताचे महान अभियंता भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. हा दिवस अभियांत्रिकीचा सन्मान करण्याची आणि देशाच्या विकासात अभियंत्यांच्या योगदानास सन्मान देण्याची संधी आहे. राष्ट्रीय अभियंता दिन हा प्रामुख्याने भारतातील अभियंत्यांना सन्मानित करतो. देशाच्या विकासात आणि तांत्रिक प्रगतीमध्ये त्यांचे योगदान हा दिवस भविष्यातील अभियंत्यांना प्रेरणा देण्याचे आणि समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये अभियांत्रिकीचे महत्त्व ओळखण्याचे काम करतो. अभियंता दिनाचे उद्दिष्ट म्हणजे अभियांत्रिकीच्या क्षेत्रात योगदान देणाऱ्या अभियंत्यांचा सन्मान करणे आणि अभियांत्रिकीचे महत्त्व दर्शविणे. भारतात हा दिवस राष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो आणि विविध अभियंता संस्था आणि शैक्षणिक संस्था कार्यक्रम आयोजित करतात. अभियंता दिन हा दिवस अभियांत्रिकी क्षेत्रातील व्यावसायिकांचा सन्मान करण्यासाठी आणि अभियांत्रिकी क्षेत्राच्या महत्त्वाला जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. हा दिवस अभियांत्रिकी क्षेत्रातील योगदान, प्रगती आणि नवीन कल्पना, नवीन विचार यासाठी समर्पित असतो. भारतीय अभियांत्रिकी कौशल्याचा गौरव करण्याची संधी आहे. राष्ट्रीय अभियंता दिनाच्या निमित्ताने, देशाच्या प्रगतीसाठी अथक परिश्रम करणाऱ्या सर्व अभियंत्यांना हार्दिक शुभेच्छा. आपल्या समर्पित प्रयत्नांनीच राष्ट्राची प्रगती होते.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### नागपुरातील विकास कामे अभिमानास्पद

'नवीन उड्डाणपूल नागपूर शहराच्या वैभवात भर घालणारा' ही तरुण भारतमध्ये प्रसिद्ध झालेली बातमी वाचली. आरटीओ चौक ते विद्यापीठ परिसर चौकापर्यंतच्या या नवीन उड्डाण पुलामुळे थेट अमरावतीकडे जाणारा प्रवास गतिमान होण्यास निश्चितच मदत होईल. तसेच आरटीओ, लॉ कॉलेज, रविनगर या रस्त्यावरील वाहतूकही सुलभ व्हावी.

भाजपा सरकार सत्तेत आल्यापासून देशात विशेषतः रस्ते वाहतुकीत, उत्तम जलदगती मार्ग, शहर बाय पास मार्ग, उड्डाणपुलांमुळे प्रवास वेळ बराच कमी झालेला आहे हे निश्चित. नागपूर शहरातही उत्तम दर्जाचे रस्ते, उड्डाणपुलांमुळे बऱ्याच भागात वाहनाने जाणे सुलभ झाले आहे. विकास करायचा असेल नागरिकांना अधूनमधून बांधकामांमुळे गैरसोयीचे जरी होते तरी विकास सर्वांच्या सोयीसाठी आहे हे समजून घेणे तितकेच महत्त्वाचे. अलिकडील काळात शहराचे बदलते रूप नागपूरकरांसाठी अभिमानास्पद आहे.

कुठल्याही विकासकामासाठी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती असलेला नेता असणे गरजेचे आहे. शहराच्या सर्वांगीण विकासात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सिंहाचा वाटा आहे हे विसरून चालणार नाही.

**राम राजे**/९४२१७७९९४५

### 'सुकून' वसाहत : हिंदूंसाठी धोक्याची घंटा

नुकताच प्रसारमाध्यमांवर प्रसारित झालेला एक व्हिडीओ बघण्यात आला. त्यात रायगडमधील कर्जत येथे 'सुकून' नावाची मुसलमानांसाठीची एक वसाहत निर्माण होत असल्याचे दिसते. या वसाहतीसंदर्भात बुरखाधारी मुसलमान महिलेने हा व्हिडीओ प्रसारित केला आहे. त्यात तिने 'सुकून एम्पायर' या आस्थापनाचे विज्ञापन केले असून, कर्जत येथे केवळ मुसलमानांसाठी असलेली हलाल जीवनशैलीवर आधारित वसाहत उभी राहत असल्याचे सांगितले आहे.

त्या महिलेने आपल्या व्हिडीओत म्हटले आहे की, समाजात आपल्याला तत्त्वांशी तडजोड करावी लागते; त्यापेक्षा इथे सुरक्षित जीवन जगता येईल. धर्मनिरपेक्ष राष्ट्रात अशा वसाहतींना परवानगी कशी मिळू शकते? अशा वसाहतींना परवानगी देणे म्हणजे समाज ऐक्याला तडा देण्यासारखे आहे. अशा प्रकारची स्वतंत्र वसाहत जर विशिष्ट पंथासाठी निर्माण होत असेल, तर हा नक्कीच हिंदूंसाठी धोक्याचा इशारा नाही का? आधीच हिंदूंना लॅण्ड जिहाद, हलाल जिहाद, लव्ह जिहाद, शिक्षण क्षेत्रातील जिहाद यांचा सामना करावा लागत आहे. त्यात अजून अशा प्रकारची वसाहत निर्माण होणे, ज्याची संपूर्ण जीवनशैली हलालवर आधारित असेल, त्यातून हलाल जिहादची पाळेमुळे निश्चितच खोलवर रुजली जातील. अशा वसाहतींच्या माध्यमातून घुसखोरांचे संघटन होण्यासाठी वेळ लागणार नाही. तसे झाले तर आज ज्या ठिकाणी हिंदू ८० टक्के आणि मुसलमान २० टक्के आहेत, तेथे हे प्रमाण उलटे होणारच.

आज अनेक ठिकाणी मशिदी आणि मदरसे हे दहशतवाद्यांच्या निर्मितीची केंद्रे होत आहेत. 'सुकून' वसाहतीतही भविष्यात असे केंद्र निर्माण झाले तर? छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमकांशी लढून हिंदवी स्वराज्य स्थापन केले आणि रायगडाला राजधानी बनवले. त्या राजधानीत 'सुकून एम्पायर' उभे राहणे हे निश्चितच धोकादायक आणि लाजिरवाणे आहे. हिंदू ऐक्याशिवाय आपले अस्तित्व सुरक्षित राहू शकत नाही. म्हणूनच आज हिंदूंनी जागृत होऊन कृतिशील राहणे ही काळाची गरज आहे.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## विद्यार्थ्यांची एक भेट आयुक्तासोबत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
या उपक्रमांतर्गत लातूर शहर महानगरपालिका सावित्रीबाई फुले मनपा शाळा क्रमांक ०९, मंठाळे नगर मधील जुलै महिन्यात झालेल्या गुणवत्ता चाचणीतील इयत्ता ८ वी व ९ वीतील पहिल्या दहा विद्यार्थ्यांची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली होती.

या मुलांना महानगरपालिकेत भेटीसाठी बोलावून स्वतः आयुक्त मानसी व अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांनी मुलांचे पुष्प देऊन स्वागत केले. या प्रसंगी सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. महादेव साठे यांनी महानगरपालिकेतील २१ विभागांची कार्यप्रणाली पीपीटीद्वारे विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. आयुक्तांनी तब्बल तीन तास सर्व विभागाच्या कार्यपद्धती बद्दल सविस्तर संवाद साधला. विशेष म्हणजे, प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना आयुक्तांच्या खुर्चीवर बसवून कामकाजाचा अनुभव देण्याची संधी दिली. या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रशासनाच्या जबाबदाऱ्या प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळाली.तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छता राखणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, पाण्याचा अपव्यय न करणे, विजेची बचत करणे व वृक्षलागवड करणे या पंचसूत्रीबद्दल मार्गदर्शन केले.

उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी घेतलेल्या या अनुभवाचे स्वहस्तलिखित अहवाल तयार करण्यास सांगितला. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना आयुक्त श्रीमती मानसी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

या विशेष भेटीतून विद्यार्थ्यांना नागरी प्रशासनाबद्दल प्रत्यक्ष ज्ञान मिळाले असून उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## मराठा आरक्षणासाठी तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आणि गावात एकही कुणबी नोंद न मिळाल्याने निराश झालेल्या २७ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली आहे. अभिजीत गोविंद सोळंके (वय २७, रा. खंडाळी, ता. अहमदपूर) असे मृत तरुणाचे नाव आहे.

या संदर्भात मयत अभिजीतचा भाऊ शिवदास सोळंके यांनी सांगितले, माझा भाऊ अभिजीत हा आरक्षणाच्या विविध आंदोलनांमध्ये सक्रिय होता. गावात कुणबी समाजाची कोणतीही नोंद सापडली नाही. मला दोन मुली आहेत आणि गावात एकही कुणबी नोंद सापडत नाही, आता कसे होणार म्हणून तो तणावात दिसत होता. शासनाकडून सातत्याने होणारी फसवणूक यामुळे तो निराश झाला होता. शहरात भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या अभिजीतने गळफास घेऊन आपले जीवन संपवल्याचे मयत अभिजीतचा भाऊ शिवदास सोळंके यांनी सांगितले. या घटनेची नोंद अहमदपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, तपास सुरू आहे.

## बंजारा समाजाला एसटी आरक्षण देण्याची मागणी द्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
गोर बंजारा समाजास हैदराबाद गॅझेटनुसार अनुसूचित जमाती एसटी प्रवर्गातून आरक्षण द्यावे, या मागणीचे निवेदन सकल बंजारा समाजाच्यावतीने तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले.

शासनाने हैदराबाद गॅझेटच्या नोंदीआधारे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जीआर काढला आहे. त्याचप्रमाणे गोर बंजारा समाजाची हैदराबाद गॅझेटमध्ये नोंद आहे. महाराष्ट्रातील बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करून सरसकट एसटी प्रवर्गातून आरक्षण देऊन जातीचे प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी सकल बंजारा समाजाच्यावतीने निवेदनात करण्यात आली आहे.

## रवी बापटले पुन्हा रमले सेवालयातील लेकरांसोबत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
हासेगावच्या सेवालयातील मुलीवरील कथीत अत्याचार प्रकरणातील पाच पैकी चार आरोपींना जामीन देण्यात आला होता. मात्र, त्यांना लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यात येण्यास बंदीची अट घालण्यात आली होती. यासंदर्भात रवी बापटले यांनी लातूर न्यायालयात अर्ज दाखल करून जिल्ह्याबाहेर राहण्याची अट रद्द करण्याची विनंती केली होती. तो अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे. ३३ दिवसांनंतर बापटले हे पुन्हा सेवालयातील लेकरांसोबत रमल्याचे दिसून आले.

सेवालयातील एका मुलीवर अत्याचार झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल होताच सेवालय प्रमुख रवी बापटले यांच्यासह पाचजणांना अटक करण्यात आली होती. १३ दिवसांनंतर लातूर न्यायालयाने बापटले यांच्यासह तीन महिलांना जामीन मंजूर केला. मात्र, पोलीस तपास पूर्ण होईपर्यंत तीन जिल्ह्यांत वास्तव्यास बंदीची अट घातली होती. न्यायालयाने बंदी उठविली असल्याने बापटले गुरुवारपासून सेवालयातील लेकरांसोबत रमले आहेत.

## प्लास्टिकचा १ टन साठा जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
महापालिका आयुक्त मानसी मीना व उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी शनिवारी हत्तेनगर येथील एका गोदामातील सिंगल युज प्लास्टिकचा जवळपास १ टन साठा जप्त करून संबंधितावर दंडात्मक कारवाई केली.

यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी कलिम शेख, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक प्रदीप गायकवाड, अमजद शेख व कर्मचारी उपस्थित होते. शहरात सिंगल युज प्लास्टिक वापरास बंदी आहे. असे असतानाही काही व्यावसायिक व नागरिकांकडून हे प्लास्टिक वापरले जात आहे. महापालिकेने गेल्या काही दिवसांपासून प्लास्टिक जप्त करण्याची मोहीम सुरू केली आहे. विशेष म्हणजे संबंधितांवर दंडही आकारला जात आहे. प्लास्टिकचा वापर वाढत आहे. व्यावसायिक आणि नागरिकांनी पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टिकचा वापर बंद करावा. यापुढेही प्लास्टिक जप्ती मोहीम सुरू राहणार आहे. नागरिक व व्यावसायिकांनी प्लास्टिक वापर बंद केला नाही तर दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिकेतर्फे देण्यात आला आहे.

## ‘केशवराज’मध्ये गुरुवंदन व छात्र अभिनंदन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
केशवराज माध्यमिक विद्यालयात गुरुवंदन व छात्र अभिनंदन कार्यक्रम संपन्न करण्यात आला. याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तसेच भारत विकास परिषदेतील सिद्धेश्वर शाखेचे प्रमुख जगदीश वारद, ज्येष्ठ सदस्य सर्वोत्तम कुलकर्णी, तसेच इतर सदस्य बालाजी बिरादार, विलास आराध्ये व पर्यवेक्षिका इंदू ठाकूर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली .

याप्रसंगी भारत विकास परिषद सिद्धेश्वर शाखा, लातूरतर्फे मंचावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यालयातील संगीत शिक्षक संतोष बीडकर , विद्यार्थ्यांकडून भगवद्गीता मुखोद्गत करून घेणाऱ्या शिक्षिका कांचन तोडकर व शैला जेऊरकर तसेच विद्यालयातील विस्तार कार्य समिती प्रमुख महादेव गोंदरकर या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यालयातील दहावी गुणवंत विद्यार्थी कु. संतोषी सूर्यवंशी व चि. ऋतुराज माडे तसेच गायन, वादन, क्रीडा, चित्रकला व रांगोळी क्षेत्रात नैपुण्यप्राप्त विद्यार्थी कु. अपूर्वा पाटील, चि. संमीहन जोशी, चि. विघ्नेश जोशी, कु. आराध्या कदम, कु. शांभवी हाजगुडे कु. समीक्षा देवने, कु. नयन बडगिरे यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## साडेनऊ लाख रुपये चोरीचा बनाव; उमरग्यातील दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
मित्राने पाठविलेले साडेनऊ लाख रुपये हडप करण्यासाठी पैशाची बॅग चोरी गेल्याचा बनाव करणाऱ्या उमरगा येथील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, साडेनऊ लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. या गुन्ह्यातील अन्य दोन आरोपी फरार असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

धाराशिवच्या उमरगा येथील रत्नदीप सुभाष सोनकांबळे (वय २०) याने गुरुवारी त्याच्याकडील पैशाची बॅग अज्ञाताने हिसकावून नेल्याची तक्रार दिल्यावरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात दोन पथके तयार करून तपास सुरू होता. दरम्यान, गोपनीय माहितीच्या आधारे संशयित आरोपी अल्ताफ अमीन बडगिरे (वय ३०, रा. बलसूर, ता. उमरगा, जि. धाराशिव) यास दयानंद कॉलेजच्या गेटसमोरून ताब्यात घेण्यात आले. कसून चौकशी केली असता, तो आणि यातील फिर्यादी व त्याच्या दोन मित्रांनी रत्नदीपला त्याच्या मुंबई येथील मित्राने पाठवलेले पैशाची बॅग चोरी गेल्याचा बनाव करून पैसे हडपण्याचा कट रचल्याचे सांगितले.

आरोपी रत्नदीप यास ताब्यात घेऊन त्याने एका हॉटेलच्या रूममध्ये बॅगेत लपवून ठेवलेले साडेनऊ लाख रुपये जप्त करण्यात आले. याप्रकरणी चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, विजय गायकवाड आणि सूरज कदम या फरार दोघांचा शोध सुरू आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, सहायक फौजदार सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार राजेश कंचे, युवराज गिरी, मोहन सुरवसे, संतोष खांडेकर, मुन्ना मदने, जमीर शेख, गणेश साठे, हरी पतंगे, बालाजी कोतवाड, रणजीत शिंदे, बोचरे यांनी ही सेवा बजावली.




## बोगस कुणबी नोंदी रद्द करा: प्रा. हाके

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
ओबीसींचे आरक्षण संपले या भीतीने रेणापूर तालुक्यातील वांगदरी येथील भरत महादेव कराड याने नदीपात्रात उडी मारून आत्महत्या केली. ही आत्महत्या नसून मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करून शासनाने घेतलेला हा बळी आहे. सरकारने तत्काळ हा जीआर रद्द करावा, बोगस कुणबी प्रमाणपत्र रद्द करावे, अशी मागणी प्रा. लक्ष्मण हाके यांनी शनिवारी केली.



प्रा. लक्ष्मण हाके यांनी शनिवारी वांगदरी येथे कराड कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन केले. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. महाराष्ट्र सरकारने ५९ लाख बोगस कुणबी नोंदी तत्काळ रद्द कराव्यात, हैद्राबाद गॅझेट लागू करण्यासाठी काढलेला जीआर रद्द करावा, अशी मागणी प्रा. हाके यांनी केली. जीआर काढून शासनाने ओबीसींचे आरक्षण संपविण्याचा घाट घातला आहे. सर्वांना विश्वासात घेऊन मुख्यमंत्र्यांनी तो जीआर काढायला हवा होता. मराठ्यांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय सरकारने केला आहे. त्यातून ओबीसींचे आरक्षण पूर्णपणे संपुष्टात आले आहे. याचा भरत कराड याला धक्का बसला. त्याने आत्महत्या केली. हा शासनाने घेतलेला एका ओबीसीचा बळी आहे. ओबीसी समाज हा लढवय्या आहे. ओबीसींचे आरक्षण टिकविण्यासाठी आपण संघर्ष करत राहू, पण कोणीही आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन प्रा. हाके यांनी केले. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना मराठा मतांची काळजी आहे. मराठ्यांना या अगोदरही १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. आम्ही ओबीसी ५० टक्क्यांनी आहोत हे लक्षात घ्या, असेही ते म्हणाले. सरकारने भरत कराड याच्या तीन मुली व एका मुलाच्या शिक्षणाची, पालनपोषणाची जबाबदारी घ्यावी, सरकारने जबाबदारी नाही घेतली तर ओबीसी समाज वर्गणी गोळा करून कराड कुटुंबीयांची जबाबदारी घेईल, असे त्यांनी सांगितले.

‘ओबीसींचे आरक्षण टिकले पाहिजे’, ‘लक्ष्मण हाके तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं’, अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यात जनावरांना लाळ-खुरकूतची साथ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
जिल्ह्यात जनावरांना लाळ -खुरकूतची साथ सुरू झाली असून, पशुसंवर्धन विभागाने रोग प्रतिबंधक विशेष लसीकरण मोहीम सुरू केली. ही मोहीम २७ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे.

या विशेष लसीकरण मोहीमेंतर्गत लातूर जिल्ह्यास ३ लाख ६१ हजार लस मात्रा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत एक लाख ११ हजार ५९४ पशुंना लसीकरण करण्यात आले. गायी, म्हशी, वासरांना लस देण्यात येत आहे. जिल्ह्यातील १३२ पशुवैद्यकीय संस्थांद्वारे लसीकरण केले जात असून, लातूर तालुक्यात सर्वाधिक २६ हजार ६५० पशुंना लस दिली गेली. जिल्ह्यातील अहमदपूर, औसा, निलंगा, रेणापूर, उदगीर, देवणी, जळकोट, चाकूर व शिरूर अनंतपाळ तालुक्यांत लसीकरण सुरू आहे. चार महिन्यांपेक्षा जास्त वयाच्या सर्व निरोगी गायी, म्हशी, बैल, रेडे व वासरांना लस देण्यात येत आहे. चार महिन्यांखालील वासरे, आजारी जनावरे, गाभण जनावरे व प्रसूतीनंतर १५ दिवसांपर्यंतची जनावरांना लस दिली जात नाही. प्रत्येक पशुला २ मि.ली. डोस इंट्रामस्क्यूलर पध्दतीने लस दिली जाते. लाळ-खुरकूत हा संसर्गजन्य विषाणूजन्य रोग असून, पशुंसाठी तो घातक आहे. या रोगाने गायी, म्हशींच्या दुधात घट, प्रजनन क्षमता कमी होणे, तसेच मृत्यूचे प्रमाण वाढते. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, सरपंच, पशुपालकांनी लसीकरणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दुराणी हुडा विद्यापीठात प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
येथील छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयातील एम. एस्सी. प्राणीशास्त्र विभागाची विद्यार्थिनी दुराणी हुडा खिजर मोहम्मद खान हिने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षेत विद्यापीठातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला. तर तिने दुहेरी सुवर्णपदक पटकावले आहे.



विद्यापीठाच्या २८ व्या दीक्षांत समारंभामध्ये दुराणी हुडा या विद्यार्थिनीला डॉ. अशोक लक्ष्मण लोहगावकर यांच्या स्मरणार्थ सुवर्णपदक आणि डॉ. एस. एल. राव लिंगपल्ली, हैदराबाद यांच्यावतीने सुवर्णपदक असे दोन पुरस्कार जाहीर झाले आहेत. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयात प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांच्या हस्ते दुराणी हुडा व तिचे वडील खिजर मोहम्मद खान यांचा सत्कार करण्यात आला.

दुराणी हुडा हिला प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उर्मिला शिरशी, डॉ. एस. डी. निटुरे, प्रा. अनुराधा भताने, प्रा. दीपाली गंभीरे, प्रा. हसनत उस्ताद यांचे मार्गदर्शन लाभले. याबद्दल तिचे कौतुक करण्यात येत आहे.

## शहरात राबवली जाणार गोवर रूबेला लसीकरण मोहीम - आयुक्त मानसी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
शहरातील सर्व शासकीय/विनाअनुदानित/अनुदानित आश्रम शाळा व मदरसा येथील पाच ते पंधरा वयोगटातील मुला मुलींना १५ ते ३० सप्टेंबर दरम्यान गोवर रूबेला लसीची मात्रा देण्यात येणार आहे. आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या अध्यक्षतेखाली सिटी टास्क फोर्स बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

सदर बैठकीमध्ये आयुक्त श्रीमती मानसी यांनी शासन स्तरावरून प्राप्त उद्दिष्ट १००% पुर्ण करणे बाबत सूचना दिल्या. सदर बैठकीस लातूर शहरातील मदरसा यांचे संचालक, आय. एम. ए. अध्यक्ष डॉ. अभय कदम, डॉ. बजाज, उपस्थित होते.



स्त्री रुग्णालयातील डॉ. नारागुडे, जागतिक आरोग्य संघटनेचे सर्विलन्स मेडिकल ऑफिसर डॉ. गायकवाड, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, महापालिकेचे आरसीएच ऑफिसर डॉ. श्यामा जाधव तसेच नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी

**अशी असणार आहे गोवर रूबेला लसीकरण मोहीम**

१. लसीकरण सत्रात एकूण सहा कर्मचाऱ्यांचा समावेश त्यामध्ये १ वैद्यकीय अधिकारी १ ए एन एम, १ स्टाफ नर्स, ३ अशा स्वयंसेविका, असे एकूण सहा जणांचा एक चमू लसीकरणाचे कामकाज पाहणार आहे. २. प्रामुख्याने ५ ते १५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना या लसीची एक मात्रा दिली जाणार आहे. ३. एक लसीकरण सत्रा मध्ये १५० मुलांना लसीची मात्रा देण्यात येणार आहे ४. केवळ प्रशिक्षित व्यक्तीच लसीकरण सत्रामध्ये लस देणार आहेत. हरातील एकही पात्र बालक या लसीपासून वंचित राहणार नाही असा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

शाळेतील शिक्षक, पालक यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून मोहीम यशस्वी करण्याकरिता सहकार्य करावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी केले आहे.

## लोकअदालतला उत्स्फूर्त प्रतिसाद

### एकाच दिवशी ३ कोटीहून अधिक कर संकलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर महापालिका यांच्यावतीने आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीस थकबाकीदार मालमत्ताधारक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शनिवारी एकाच दिवशी ९०० थकबाकीदार मालमत्ताधारकांकडून तब्बल ३ कोटीहून अधिक कर संकलन करण्यात आला.

राष्ट्रीय लोकअदालतचे शनिवारी महापालिका मुख्यालय येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष एस. जे. भारुका, सचिव व्ही. एन. गिरवलकर आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक मानसी मीना यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून निवृत्त जिल्हा न्यायाधीश पी. एम. शिंदे व वकील प्रतिनिधी म्हणून ॲड. आशिष पौळ यांनी काम पाहिले.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात संपूर्ण कर वसुली करण्याचे निर्देश आयुक्त मीना यांनी कर संकलन विभागास दिले होते. त्यादृष्टीने उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन विभाग वर्षाच्या सुरुवातीपासूनच कर वसुलीच्या दृष्टीने मालमत्ताधारकांना विविध सवलती देण्यात आल्या होत्या.

थकबाकीदार मालमत्ताधारक यांच्याकडील थकीत कराची रक्कम पाहता ही प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी ८० टक्के शास्ती माफीही लागू करण्यात आली होती. सदर योजना एक दिवसासाठी लागू करण्यात आली होती. त्यात लोकअदालत सोबतच इतर थकबाकीदार अशा तब्बल ९०० हून अधिक थकबाकीदार मालमत्ताधारकांकडून एकाच दिवसात ३ कोटींचा कर संकलन करण्यात कर विभाग यशस्वी झाला. ८० टक्के शास्ती माफी योजना व लोक अदालतममध्ये अधिकाधिक नागरिकांना सहभागी होता यावे या दृष्टीने कर अधीक्षक प्रतीक मुसंडे, क्षेत्रीय अधिकारी संतोष लाडलापुरे, बंडू किसवे, समाधान सूर्यवंशी, विजय राजुरे यांच्यासह सर्व कर पर्यवेक्षक व वसुली लिपिक यांनी परिश्रम घेतले.

## नांदुर्गा तांडा शिवारातून ७१ किलो गांजा जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१५ सप्टेंबर -**
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने औसा तालुक्यातील नांदुर्गा तांडा शेत शिवारात शनिवारी सायंकाळी छापा मारून ७ लाख ९ हजार रुपये किमतीचे ७१ किलो गांजाची झाडे जप्त केली. एका आरोपीस अटक करण्यात आली असून, अन्य एका फरार आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत. याप्रकरणी दोघांविरुध्द किल्लारी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशान्वये लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कार्यवाही करण्यात येत आहे. दरम्यान, औसा तालुक्यातील नांदुर्गा तांडा शेत शिवारात गांजाच्या झाडांची लागवड करण्यात आल्याची माहिती मिळाली.

अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने शनिवारी सायंकाळी औसा तालुक्यातील नांदुर्गा तांडा शेत शिवारात छापा मारून उसाच्या शेतामधून लागवड करण्यात आलेली ७ लाख ९ हजार ९०० रुपये किमतीची ७१ किलो गांजाची झाडे जप्त केली. याप्रकरणी शेतमालक बळीराम दगडू पवार (वय ६०, रा. नांदुर्गा तांडा, ता. औसा) याला अटक करण्यात आली आहे. त्याचा एक साथीदार फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत. याप्रकरणी दोघांविरुध्द किल्लारी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक रेवनाथ डमाळे, सहायक पोलीस निरीक्षक माणिक डोके, सहायक पोलीस निरीक्षक विशाल शहाणे, पोलीस उपनिरीक्षक मरडे, शिंदे, पोलीस अंमलदार अर्जुन राजपूत, दीनानाथ देवकते, साहेबराव हाके, मुबाज सय्यद, राहुल कांबळे, चंद्रकांत केंद्रे यांनी ही कारवाई केली.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माजलगाव धरणाचे ११ दरवाजे उघडले



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१५ सप्टेंबर**

माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्याने रविवारी दुपारी धरणाचे ११ दरवाजे उघडण्यात आले. यामुळे सिंदफणा नदीत मोठा विसर्ग सुरू असून, सांडस चिंचोली गावाचा संपर्क तुटला आहे. दुसरीकडे, पैठणच्या जायकवाडी धरणातून पाणी सोडल्याने गोदावरी नदीला पूर आला असून, यामुळे गव्हाणथडी गावाचा संपर्कही तुटला आहे.

गेल्या पंधरा दिवसापूर्वी धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर दोन दिवस नऊ दरवाजे उघडण्यात आले होते. शनिवारी पुन्हा जोरदार पाऊस झाल्याने धरणाची पाण्याची अवक मोठया प्रमाणात वाढली. सकाळी ११ वाजता सात दरवाजे ५० मीटरने उद्धरण्यात आले. पाण्याची आवक वाढतच राहिल्याने दुपारी १२.३० वाजता धरणाचे ११ दरवाजे ०.८० मीटरने उघडून सिंदकमा नदीपात्रात ३१ हजार ३३५ क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला.

# शासनाने अतिवृष्टी पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी–आ.क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ सप्टेंबर**

बीड जिल्हासह शहर आणि तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे आणि ग्रामस्थांचे नुकसान झाल्याने शासनाने नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड शहर व तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर काल रात्रीपासून मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे बिंदुसरा तसेच इतर छोटे-मोठे तलाव,नदी,ओढे तुडुंब भरले असून पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. काल रात्री झालेल्या पावसाने पीक, पशुहानी, शेतकरी बांधव व ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.ना.अजित दादा पवार तसेच बीडच्या जिल्हाधिकारी यांना बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी पत्र देऊन केली आहे.

बीड विधानसभा क्षेत्रातील बीड व शिरूर (का) तालुक्यातील सर्वच महसूल मंडळामध्ये दि.२८ ऑगस्ट २०२५ दरम्यान झालेल्या आणि १३ सप्टेंबर २०२५ पासून ते आजपर्यंत सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने क्षेत्रातील उभा असलेला सोयाबीन, कापूस, बाजरी आदी पिकांचे तथा फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच शेतकरी बांधवांच्या पाळीव पशुधनाचे देखील नुकसान झाले आहे. यासह शहरी व ग्रामीण भागात देखील पावसामुळे मोठी पडझड झाली आहे. आजपर्यंत सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने विद्युत पोल, तारा व रोहित्र नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे शासनाच्या वतीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकरी बांधवांना व ग्रामस्थांना सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाला युवा रंग युवक महोत्सवात प्रहसन मध्ये प्रथम पारितोषिक

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ सप्टेंबर**

येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या युवक महोत्सवात सहभागी झालेल्या संघाने प्रहसन या कला प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. युवक कल्याण विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छ. संभाजी नगर यांच्या वतीने बीड जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे आर.बी. अट्टल कॉलेज, गेवराई येथे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या विद्यार्थी कलाकारांनी अनेकविध कला प्रकारात आपले सादरीकरण केले. प्रहसन या मधील प्रथम क्रमांकाबरोबरच मुकनाट्य प्रकारात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक तर प्रश्न मंजुषा स्पर्धा प्रकारात तसेच पाश्चात्य सुगम गायन या मध्ये तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. जिल्हास्तरीय युवक महोत्सवात महाविद्यालयाने चांगली कामगिरी केली. या समुहामध्ये मध्ये आविष्कार जंगले, भार्गवराम रामदासी, श्वेता जाधव, सारंग सुनिता अशोक, श्रीराम वाशिंबे, पियुष सावरे, श्रुती शिरसाट,



त्रिशरण, करण चाटे, मधुरा अडसुळे, संकेत पवार,प्रथमेश उपाडे,

हे विद्यार्थी कलाकार सहभागी झाले होते. नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी या संघाला मार्गदर्शन केले. दि. २८ व २९ सप्टेंबर २०२५ या तारखेला छ. संभाजी नगर येथे होत असलेल्या विद्यापीठ पातळीवरील केंद्रीय युवक महोत्सवात महाविद्यालयातील हा विजयी संघ सहभागी होणार आहे. या विजयी संघाचे योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर, कार्यकारी उपाध्यक्ष अॅड.जगदीश चौसाळकर, उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, कोषाध्यक्ष डॉ. शैलेश वैद्य संस्थेचे जेष्ठ सल्लागार व महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्रा. माणिकराव लोमटे, जेष्ठ सल्लागार प्रा.एन. के. गोळेगावकर, कार्यकारिणीचे सर्व सन्माननीय संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत देशमुख, उपप्राचार्य डॉ. रमेश सोनटक्के, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य जितेंद्र देशपांडे, कार्यालयीन अधीक्षक श्रीहरी रामदासी, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजयी कलाकार विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# शंकरराव बरकसे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ सप्टेंबर**

येथील कोल्हेर रोडवरील आश्रमशाळेसमोर वास्तव्यास असलेले शंकरराव रंगनाथराव बरकसे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्पशा आजाराने रविवारी रात्री १० . ३० वाजता निधन झाले . त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले ,एक विवाहित मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे . स्व . शंकरराव बरकसे हे प्रा . राजेंद्र बरकसे यांचे बंधू व अवनी कॉम्प्युटर्सचे संचालक गणेश बरकसे यांचे ते वडिल होते . स्व . शंकरराव बरकसे यांच्या पार्थिवावर सोमवार दि . १५ रोजी दुपारी १२ वाजता चिंतामणी स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले . यावेळी समाजातील प्रतिष्ठित नागरिक नातेवाईक अंत्ययात्रेत सहभागी झाले होते . सुस्वभावी स्वभावामुळे स्व शंकरराव यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ पसरली आहे



# स्वामी विवेकानंद विद्यामंदिरात शिक्षक–पालक मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१५ सप्टेंबर**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज, संचलित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर ( मा. वि. ) या शाळेमध्ये दि. १३ सप्टेंबर २०२५ वार शनिवार रोजी शिक्षक–पालक मेळावा संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंकुशरावजी इंगळे अध्यक्ष– जीवन विकास शिक्षण मंडळ तथा सभापती– कृषी उत्पन्न बाजार समिती केज तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, सहसचिव गणेश कोकीळ, शालेय व्यवस्थापन समिती स्वयंअर्थ शाळेचे अध्यक्ष नारायण अण्णा अंधारे, शालेय व्यवस्थापन समितीच्या ( मा. वि. ) अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्राचार्य शंकर भैरट आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रारंभीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेतील सहशिक्षिका पुसदेकर मॅडम यांनी स्वागतपरस्तवन सादर केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय शैलाताई इंगळे यांनी दिला. याप्रसंगी त्या म्हणाल्या, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये पालकांचेही योगदान अतिशय महत्त्वाचे असते. तेंव्हा सध्याचा काळ, विद्यार्थ्यांची मानसिकता, पालकांची जबाबदारी व यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेची भूमिका काय आहे याविषयी उपस्थित पालकांना सखोल असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील विविध स्पर्धेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणात्मक व संख्यात्मक आलेख सादर केला. त्या म्हणाल्या, मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस. एस. सी. बोर्ड परीक्षेमध्ये शाळेचा



१०० टक्के निकाल लागला असून शाळेतील सहा विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० टक्के गुण संपादित केले. तर एकूण २३३ विद्यार्थ्यांपैकी विशेष प्राविण्यासह २२४ तर प्रथम श्रेणीत ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तसेच विविध स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी– एन. एम. एम. एस. व सारथी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एकूण १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र, ५ विद्यार्थ्यांची आठवी शिष्यवृत्तीसाठी निवड, एमटीएस ओलंपियाड राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेमध्ये राज्य व जिल्हा गुणवत्ता यादी मध्ये २ विद्यार्थी, हिंदी ओलंपियाड राज्यस्तरीय परीक्षेत १ विद्यार्थी शाळा राज्यातून ८ वा आला.

# अंबाजोगाई तालुक्यात पावसाचे थैमान : अनेक गावांचा संपर्क तुटला, जनजीवन विस्कळीत

ढगफुटी सदृश पाऊस

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजागोई दि.१५ सप्टेंबर**

अंबाजोगाई तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसाचा तडाखा इतका जबरदस्त आहे की, अनेक ठिकाणी रस्ते वाहून गेले असून काही गावांचा संपर्क तुटला आहे. ग्रामीण भागातील ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

राक्षसवाडी व केकाणवाडी परिसरातील पाझरतलाव पावसाच्या पाण्याने फुगून फुटल्याने हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. सोयाबीन, कापूस, मका यांसह खरीप हंगामातील विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. प्राथमिक अंदाजानुसार लाखों रुपयांचे नुकसान झाले असल्याचे सांगितलें जात आहे. अंबाजोगाई – मांडवा पठाण मार्गावरील वान नदीला आलेल्या पूरामुळे पुलावरून पाणी वाहू लागले असून, अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. वाहतूक ठप्प झाली असून प्रशासनाने नागरिकांना खबरदारीचे आवाहन केले आहे.



अंबाजोगाई तालुक्यातील काही ठिकाणी लहान मोठे पूल वाहून गेले असल्याने गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याचे काम सुरू आहे. अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्याने अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे.दरम्यान, मांजरा प्रकल्पाच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत असल्याने सहा दरवाज्यांतून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाकडून नागरिकांना अनावश्यक बाहेर पडू नये, नदीकाठाला जाऊ नये, अशी सूचना करण्यात आली आहे.तालुक्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, पोलीस व महसूल विभाग सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, मदत व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. ग्रामीण भागातील ग्रामस्थांमध्ये मात्र भीतीचे वातावरण आहे.

# स्वच्छता व वीज पाणी व रस्त्याची व्यवस्था करणे गरजेचे–शिराळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ सप्टेंबर**

बीड शहरांमध्ये सध्या जागोजागी रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांना चालताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे खड्ड्यात रस्ता आहे की रस्त्यात खड्डे आहेत हेच समजत नाही आणि सध्या बीड शहराच्या जवळ असलेले बिंदुसरा प्रकल्प व सांडून वाहत असताना देखील बीड शहराला पंधरा ते वीस दिवसाला पाणी सोडले जाते हे दुर्दैव बिड करायचे आहे की काय असे देखील बीड शहरातील नागरिकांमधून संतापताची लाट सध्या व्यक्त होत आहे तोंडावरच दसरा व दिवाळी येऊन ठेपलेली आहे सध्या पितृ पक्ष पंधरवाडा चालू असून महिला भगिनी घरातील भांडे धूने कपडे दसऱ्यानिमित्त धुण्यासाठी काढत असतात तसेच घरोघरी रंग रगोटी देखील केली जाते परंतु पाण्याअभावी ही कशी रंगरंगोटी करावी कसे धुणे धुवावे कसे भांडे मोठे धुने करावे कसे मोठे मोठे टेबल बाकडे खुर्च्या घरातील सर्वच साहित्य पंखा सह सर्व साहित्य धुण्यासाठी पाणी लागते परंतु १५ ते २० दिवसाला बीड शहराला पाणी सोडले जाते मग हे कसे साहित्य हे धुवायचे पाण्याअभावी तसेच ठेवायचे की काय असा प्रश्न देखील माता भगिनींना बीड शहरातील पडलेला आहे शिवसागर यांची सत्ता बीडला असल्यापासून बीड शहराला पंधरा ते वीस दिवसाला पाणी मिळत आहे आणि आता सध्या नगरपालिकेचे असलेले प्रशासक साहेब यांनी या महत्त्वाच्या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ दररोज बीडकरांना पाणी सोडावे असे नागरिकांमधून बोलले जात असल्याचे मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून म्हटले आहे जर येणाऱ्या दोन दिवसात जर बीड शहराला पाणीपुरवठा जर सुरू नाही केला तर बीड नगर प्रशासनाला कुलूप ठोकले जाईल असा इशारा देखील शिराळे पाटील यांनी दिला आहे.

# बँक हे केवळ आर्थिक व्यवहाराचा मंच नसून समाजाच्या उन्नतीचा दीपस्तंभ आहे–राजकिशोर मोदी

## अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ सप्टेंबर**

विश्वास, सेवा आणी सहकार्य या तीन तत्वावर चालणाऱ्या अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि १३ रोजी शहरातील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात बँकेचे सर्व ग्राहक, सभासद व खातेदारांच्या उपस्थितत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यांप्रसंगी बोलताना संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी बँक हे केवळ आर्थिक व्यवहाराचाच मंच नसून समाजाच्या उन्नतीचा दीपस्तंभ असल्याची भावना व्यक्त केली. जनसामान्यांच्या आर्थिक विकासाला गती मिळून त्यांचे जीवनमान उंचावे यासाठी अंबाजोगाई पिपल्स बँकेची मागील २९ वर्षांपूर्वी निर्मिती केली असेही मत देखील या सर्वसाधारण सभेत राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. यावेळी



व्यासपीठावर बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी ,यांच्यासह पिपल्स बँकेचे संचालक प्रा. वसंत चव्हाण , ऍड विष्णुपंत सोळंके, पुरुषोत्तम चोकडा ,ऍड सुधाकर कऱ्हाड, संकेत मोदी, सुधाकर विडेकर, शेख दगडू शेख दावल, प्रकाश लखेरा,श्रीमती वनमाला रेड्डी, स्नेहा हिवरेकर, हर्षवर्धन वडमारे, तज्ञ संचालक संदेश बोराडे, प्रा. बाळासाहेब चव्हाण ,ऍड अनिल व्यवहारे, लक्ष्मण दासूद , सचिन बेंबडे , हाजी महमूद, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांच्यासह सभागृहात जेष्ठ सभासद तथा मार्गदर्शक प्रा नानासाहेब गाठाळ, प्राचार्य बी आय खडकभावी, दिनकर जोशी, डॉ आरसुडे, प्रा शांतीनाथ बनसोडे, प्रा. माणिकराव लोमटे,प्रा. बळीराम जोगदंड, प्रा. एस पी कुलकर्णी, मुझमील खतीब, संजय भोसले, महादेव आदमाणे, अमोल लोमटे, धम्मा सरवदे, दिनेश भराडिया,युवराज काळम पाटील रोटरी क्लब च्या अध्यक्षा रोहिणी पाठक, शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट यांच्यासह अनेक ग्राहक व सभासद उपस्थित होते .

# आष्टी मतदार संघातील विविध विकास प्रकल्पांबाबत आढावा बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ सप्टेंबर**

आष्टी मतदार संघातील विविध महत्त्वाच्या विकास प्रकल्पांसाठी भूसंपादन, जलसिंचन प्रकल्प, रस्ते, वनीकरण आणि इतर महत्त्वाचे प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित आष्टी मतदार संघातील विविध महत्त्वाच्या विकास विषयांच्या आढावा बैठकीत आष्टी विधानसभा मतदार संघाचे आमदार सुरेश धस, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रभोदय मुळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, अधिक्षक अभियंता श्री. शिंगाडे, कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी, उपविभागीय अधिकारी, बीड कविता जाधव, उपविभागीय अधिकारी, पाटोदा वशिमा शेख, वनपरिक्षेत्र अधिकारी, अमोल गरकल तसेच सर्व संबंधित विभागाचे अधिकारी आदींची उपस्थिती होती.

यावेळी बैठकीत आष्टी मतदार संघातील विविध महत्त्वाच्या विकास प्रकल्प प्रशासनाच्या दृष्टीने हे सर्व प्रकल्प स्थानिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून सर्व संबंधीत विभागांनी आपले प्रस्ताव तात्काळ सादर करुन त्यास मंजूरी करुन कामे पूर्ण करण्यात यावे. तसेच संबधीत विभागाने यासाठी त्वरित बैठकीचे आयोजन केले आहे आणि तक्रारींचे निराकरण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांनी दिल्या.

आमदार सुरेश धस आष्टी, पाटोदा, शिरूर (का) मतदार संघात जी विविध विकास कामे सुरु आहेत त्या कामास संबंधीत विभागांनी तात्काळ निर्णय घेवून कामे सुरु करावीत. तसेच ज्या कामात काही अडचण असल्यास जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार ती सोडवून तात्काळ मार्गी लावावीत. मतदार संघातील विविध प्रकल्पांमुळे परिसरातील पाणी व्यवस्थापनात सुधारणा होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना सिंचन सुविधाही उपलब्ध होणार आहे. याकरीता आष्टी मतदार संघातील विविध अपूर्ण भूसंपादन प्रकियेसाठी प्रशासनाने तातडीने मार्गी लावाव्यात. प्रशासनाने यासंबंधी योग्य नियोजन करून या विकास प्रकल्पास गती द्यावी. या विकासकामामुळे स्थानिक नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होणार असल्याचे ते म्हणाले.

# अशोक कोरडे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ सप्टेंबर**



बीड तालुक्यातील जरूड येथील रहिवासी तसेच भारतीय बौद्ध महासभेचे माजी जिल्हाध्यक्ष अशोक विठ्ठल कोरडे (वय ७९वर्ष यांचे दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जरूड येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने कोरडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात हळहळ व्यक्त होत आहे.

अशोक कोरडे हे दीर्घकाळापासून भारतीय बौद्ध महासभेच्या संघटनात्मक कार्यात सक्रिय होते. त्यांनी जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र संस्कार विभागाचे उपाध्यक्ष तसेच केंद्रीय शिक्षक यांसह विविध पदांवरून कार्य करत बौद्ध समाज व वंचित घटकांमध्ये समता व जागृतीची चळवळ राबवली. त्यांच्या कामामुळे त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली होती.





गंगाखेड- तालुक्यात माखणी महसूल मंडळातील डोंगरगाव, डोंगर जवळा, कोदरी, बडवणी सिरसम व इतर गावांमध्ये आज पहाटे ४ ते ७ दरम्यान झालेल्या अतिवृष्टी / ढगफुटी सदृश्य पावसामुळे महापूर आला. घराचे व पिकांचे नुकसान झाले आहे. सदर गावांना उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांनी भेट देऊन पाहणी केली व नागरिकांना दिलासा दिला. यावेळी तहसीलदार, गंगाखेड, तालुका कृषी अधिकारी व त्यांचे अधिनिस्त अधिकारी,कर्मचारी व शेतकरी दिसत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### पालम शहर उपाध्यक्षपदी नाईकवाडे



**पालम,/प्रतिनिधी-** बीजेपी कार्यालय येथे सेवा पंधरवडा कार्यक्रमानिमित्त आयोजित केलेल्या पदाधिकारी संवाद मेळावा पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून.शिवाजीराव मोहोळ व माजी जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ मुरकुटे उपस्थित होते. यावेळी नवीन कार्यकारणी ची निवड करण्यात आली. पालम शहर उपाध्यक्षपदी रामदास पंडितराव नाईकवाडे यांची निवड करण्यात आली . निवडीचा पत्र संतोष भाऊ मुरकुटे व शहराध्यक्ष पांडुरंग तात्या रोकडे यांनी दिली यावेळी लक्ष्मणराव रोकडे अंकल. पांडुरंग रोकडे. माझी जिल्हा उपाध्यक्ष ग्रामीण नंदकुमार बोलोरी. तालुकाध्यक्ष.मलिकार्जुन लांडगे. शेख बशीर. उपस्थित होते.

## पूर्णा येथे सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**पूर्णा, प्रतिनिधी-** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व श्री गुरु बुध्दिस्वामी शिक्षण प्रसारक संस्था पूर्णा संचलित श्री गुरु बुध्दिस्वामी महाविद्यालय, पूर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री गुरु बुध्दिस्वामी महाविद्यालय, पूर्णा येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडून जिल्ह्यातील गरजू सुशिक्षित बेरोजगाराना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने हा रोजगार मेळावा आयोजित केलेला आहे. या मेळाव्यास राज्यातील विविध नामांकित मोठे उद्योजक कंपन्या सहभाग नोंदविणार आहेत. जिल्ह्यातील बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी, बी.ई. पॉलिटेक्नीक इत्यादी शैक्षणीक पात्रता धारक उमेदवाराची बँक ऑफीसर (सर्व कोऑपरेटिव्ह बँक), बीजनेस डेव्हलपमेंट मॅनेजर, फिल्ड ऑफीसर, ट्रेनी ऑपरेटर, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ॲप्रेटशिष ट्रेनी, क्षेत्र अधिकारी (एसएफओ), क्षेत्र अधिकारी (आरओ), सेल्स रिप्रजेंटेटिव्ह, फिल्ड असीस्टंट ट्रेनी, ट्रेनी केंद्र मॅनेजर, विमा सल्लागार, विमा सखी इत्यादी पदांसाठी मुलाखातीव्दारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी किमान वेतन १८ हजार ते २५ हजार असणार आहे.

महारोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सुशिक्षित उमेदवारांनी नाव नोंदणी शासनाच्या (..) या वेबसाईटवर करावी महारोजगार मेळाव्यात प्रत्यक्ष नावनोंदणी करण्यासाठी दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री गुरु बुध्दिस्वामी महाविद्यालय, पूर्णा येथे स्वखर्चाने सर्व उमेदवारांनी उपस्थित राहावे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी सदर मेळाव्यास सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाचे दुरध्वनी क्र. ०२४५२-२२००७४ संपर्क साधावा असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त बा.सू.मरे यांनी केले आहे

## येलदरी जलाशयातून दोन दरवाज्याव्दारे पूर्णा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग

**जिंतूर, प्रतिनिधी-** पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाच्या येलदरी जलाशयातून दरवाजा क्रमांक १ व १० हे दोन दरवाजे ०.५ मीटरने सोमवारी सायंकाळी ७ वाजता उचलण्यात आले असून या दोन दरवाजातून पूर्णा नदीच्या पात्रात ४२१९.९४ क्युसेक इतका पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. येलदरी धरणाच्या उर्ध्व बाजूने जलाशयात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरु झाली आहे. त्यामुळे पाटबंधारे खात्याने दोन दरवाजांच्या माध्यमातून नदीपात्रात पाणी सोडण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, जलशुध्दीकरण केंद्रासही या जलाशयातून पाणी पुरवठा सुरु आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
१.**गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# समाजाची सेवा करण्यासाठी मनाची दानत असावी लागते - काळे

### जिंतूरात स्व. अयोध्या बाई रामनारायण तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर /प्रतिनिधी-** स्व.गिरीधारीलालजी तोष्णीवाल यांच्या बाराव्या पुण्यस्मरणानिमित्त स्व. आयोध्याबाई रामनारायण तोष्णीवाल चरिटेबल ट्रस्ट व उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने तारीख १३ रोजी मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील जिजामाता विद्यालय व डॉ. सुभाषचंद्र राठी बालक विद्या मंदिर शाळेत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून संदीपभाई शर्मा महाराज तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून अप्पर जिल्हाधिकारी प्रतापराव काळे, तहसीलदार राजेश सरोदे,नायब तहसीलदार प्रशांत राखे, चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ब्रिजगोपालजी तोष्णीवाल, माहेश्वरी सभेचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंदप्रसाद पोरवाल, गजानन शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष सुभाषआप्पा एकशिंगे, रमणजी तोष्णीवाल, डॉ. सुरेश तिवारी, डॉ. रामकिशन गायकवाड, डॉ. शिवराज वनसुरे, डॉ. सचिन नीलमकर, डॉ. कीर्ती सेनगावकर उपस्थित होते.

यावेळी प्रतापराव काळे यांनी तोष्णीवाल चारीटेबल ट्रस्टच्या वतीने होत असलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक करून समाजातील सर्वसामान्य गोरगरीब लोकांसाठी शासनाकडून महात्मा फुले आरोग्य योजना दहा लाखापर्यंत करण्यात आली. याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांनी घेतलाच पाहिजे. परंतु निस्वार्थीपणे तोष्णीवाल परिवाराच्या वतीने होत असलेले काम हे सामाजिक उत्तरदायित्व म्हणून होत आहेत. सामाजिक काम करताना पैसा नव्हे तर सर्वसामान्य, गोरगरिबांसाठी काम करण्यासाठी मनाची दानत असावी लागते असे गौरवोद्गार त्यांनी काढले. यावेळी ब्रिज गोपालजी तोष्णीवाल यांनी ट्रस्टच्या वतीने होत असलेल्या कार्याचा आढावा प्रस्ताविकात केला. गेल्या १७ वर्षापासून चारिटेबल ट्रस्टच्या वतीने चार हजारापेक्षा जास्त रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली असून उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालयाच्या वतीने आत्तापर्यंत एक लाखापेक्षा जास्त रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. सामाजिक दायित्व म्हणून आपण हे काम पुढे चालू ठेवत असत असल्याचे ते म्हणाले. तर समारोपात संदीप भाई शर्मा महाराज म्हणाले की, गेल्या १७ वर्षापासून तोष्णीवाल परिवाराकडून होत असलेले कार्य गोरगरिबांच्या कल्याणासाठी होत



आहे. यावेळी तहसीलदार राजेश सरोदे यांनी मार्गदर्शन करून ट्रस्टच्या कार्याचे कौतुक केले.

शिबिरादरम्यान ३७५ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.त्यापैकी २१० रुग्णांना शास्त्रक्रियेसाठी उदगीर येथे रवाना करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकटेश राखे यांनी तर आभार प्रदर्शन विनोद पाचपिले यांनी केले. मुख्याध्यापक मनोहर कदम, गजानन तिखे, गजानन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली कनक पतसंस्था, जिजामाता विद्यालय, डॉ.सुभाषचंद्र साठी बालक विद्यामंदिर शाळेतील कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

## बोरी येथे पोलिस भरती मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

**बोरी,/प्रतिनिधी :** बोरी येथे पोलीस भरती मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

बोरीत मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व लोकनेते माजी उपमुख्यमंत्री स्व. सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त बोरी येथे मोफत पोलीस भरती मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन श्री धर्मजागरण मंचच्या वतीने बूधवार दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ठीक ११ वा. श्री राम मंदिर सभागृहात करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात शासनाकडून नुकतीच पोलीस दलात १५,६,३१ जगांच्या भरतीची घोषणा करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने या मेळाव्यात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या मेळाव्यात प्रमुख वक्ते म्हणून श्री. ज्ञानेश्वर चोपडे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष श्री. गजानन चौधरी तर प्रमुख पाहुणे म्हणून स.पो.नि. श्री. सुनील गोपीनवार,दादाराव कुटे यांची उपस्थिती राहणार आहे.बोरी व परिसरातील जास्तीत जास्त युवक, युवती व विद्यार्थ्यांनी मेळाव्यात उपस्थित रहावे, असे आवाहन योगेश चौधरी, अनिल गोरे, दुर्गेश चौधरी,अनिकेत अवचाटे,सुनील नितनवरे, राहुल भिसे, विकास काळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिंतूर ते औंढा रोडवर भीषण अपघात दोन ठार पुंगळा गावाजवळ घटना, अपघाताच्या संख्येत वाढ

**जिंतूर,/प्रतिनिधी-** सोमवार रोजी सकाळी चार ते पाच च्या दरम्यान जिंतूर ते औंढा रोडवर पुगळा गावाजवळ सोमवारी सकाळी चार ते पाच च्या दरम्यान घडली घटना आंध्रप्रदेशातून जिंतूर कडे येणारा ट्रक क्रमांक ऐ पी १६टि जे ६३१८ या क्रमांकाचा १६ टायर ट्रक मालाने भरलेला असताना पुगळा गावाजवळ पिंपळाच्या झाडाला जोरात धडक दिल्यामुळे ट्रक मधील ड्रायव्हर आणि किनर जागीच मृत्यू पावले हा अपघात एवढा भीषण झाला की जवळपास पुगळा येथील नागरिक व जिंतूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी आणि महामार्गाचे कर्मचारी तीन ते चार तास त्या गाडीतील मृत पावलेल्या ड्रायव्हर आणि किनर



यांना ट्रकच्या केबिन मधून काढण्यास वेळ लागला शेवटी गाडीच्या केबिन मधून कापून ते मृतदेह काढले त्या गाडीची केबिन पूर्णपणे पिंपळाच्या झाडात फसल्याने सकाळी पाच वाजल्यापासून ते नऊ वाजेपर्यंत मृतदेह काढण्यात आले आहे त्या चालकाचा ताबा सुटल्याने अपघात झाल्याची चर्चा पुंगळा येथील नागरिकांतून होत आहे त्या ठिकाणी जेसीबी व क्रेन व महामार्गाचे पथक व पोलीस स्टेशनचे कर्मचारी पुंगळा गावातील नागरिक मोठ्या संख्येने त्या अडकलेल्या व्यक्तींना काढण्यात प्रयत्न केला शेवटी नऊच्या दरम्यान ते मृतदेह बाहेर काढण्यात आले त्यानंतरच्या ते मृतदेह जिंतूर ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले पुढील तपास जिंतूर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी करीत आहेत.

# ऐन बहरातील सोयाबीनला लागल्या नाही फुले अन् शेंगा

### सेलू तालुक्यातील प्रकार : ७६ एकरवर केली होती पेरणी

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** महागड्या कंपनीचे बियाणे खरेदी करून सोयाबीनची पेरणी केली. सोयाबीन पीकाची चांगली वाढ होऊन बहरात आले असतानाच सोयाबीनच्या झाडाला फुले व शेंगा लागल्या नसल्याचा प्रकार कवडधन,चिकलठाणा व साळेगाव शिवारातील ७६ एकर क्षेत्रावर घडला आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे धाव घेतली आहे.

तालुक्यातील कवडधन येथे अशोक काकडे, वरद काकडे, हर्षवर्धन काकडे यांची एकूण १८ एकर शेतजमीन आहे. त्यांनी सेलू तील योग आग्रो एजन्सी वरून खरीप हंगामात सोयाबीनची पेरणी करण्यासाठी फुले संगम ७२६ च्या पाच बॅग, फुले किमया ७५३ च्या तीन, रुची ९००१ आठ, इनोवेज १०८ दोन आणि ग्रीन गोल्ड ३३४४ कंपनीच्या दोन बॅग अशा एकूण वीस बॅग खरेदी केल्यानंतर १८ एकर जमीनवर २७ जून ते ३० दरम्यान पेरणी केली होती. चिकलठाणा व साळेगाव शिवारातील एकूण ५ शेतकऱ्यांच्या ५८ एकर सोयाबीनला शेंगा व फुले लागले नसल्याचा प्रकार घडला आहे त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी चिंतेत सापडले आहेत. चिकलठाणा शिवारात जगन्नाथ बाजीराव जाधव,शांताबाई बाजीराव जाधव व सुवर्णा जगन्नाथ जाधव अनुक्रमे ४४, ६१, ७१, ७२, ७४ गटात एकूण ३५



**१५ लाखाहून अधिक नुकसान शेतकरी अशोक काकडे यांनी आपल्या १८ एकर शेतजमिनीवर लाखो रुपये खर्च करून सोयाबीनची लागवड केली आहे मात्र सोयाबीनला फुले आणि शेंगा लागल्या नसल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. १८ एकर शेतजमिनीवर दीडशे ते दोनशे क्विंटल सोयाबीनचे उत्पन्न होण्याची शक्यता होती. दरम्यान, सोयाबीन बहरत असतानाच फुले व शेंगा का लागले नाही याचा शोध संबंधित यंत्रणेला घ्यावा लागणार आहे.**

एकर जमीन आहे. यावर त्यांनी सोयाबीनच्या ३५ बॅगची पेरणी केली. साधारण २९ जून ते चार जुलै या दरम्यान त्यांनी सोयाबीन पेरले. तर जुलै महिन्यात दमदार पाऊस झाल्याने सोयाबीनची उगम क्षमता चांगली झाली. त्यानंतर आवश्यक त्यावेळी खत आणि फवारण्या केल्या. त्यामुळे सोयाबीन दोन ते अडीच फूट वाढले आहे. सद्यस्थितीत सोयाबीन बहरत आले आहे. परंतु, झाडाला फुले आणि शेंगा लागल्या नसल्याने संबंधित शेतकऱ्याची चिंता वाढली आहे. विशेष म्हणजे पाच वेगवेगळे वाहनाची पेरणी करू नये सोयाबीनच्या झाडाला फुले आणि शेंगा लागल्या नाहीत. शेतकरी काकडे यांनी सोयाबीनची पेरणी करण्यासाठी महागडी बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, मजुरी यावर जवळपास पाच लाख रुपये खर्च केला आहे. जीवापाड मेहनत आणि खर्च करून सोयाबीनला फुले आणि शेंगा लागल्या नसल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



## प्र. दि. क्रांती संस्था आंदोलन संघटना परभणी जिल्हाप्रमुख पदी बालाजी मारोती पौळ

**पालम,/प्रतिनिधी-** प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू यांच्या आदेशानुसार व प्रहार जनशक्ती पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष बल्लू भाऊ जंजाळ यांच्या आदेशानुसार प्रहार दिव्यांग क्रांती संस्था आंदोलन संघटनेचे प्रदेशअध्यक्ष धर्मेंद्र सातव यांच्या हस्ते प्रहार दिव्यांग क्रांती संस्था आंदोलन संघटना परभणी जिल्हाप्रमुख पदी बालाजी मारोती पौळ यांची नियुक्ती करण्यात आली यावेळी विष्णू वैरागड विष्णुपंत गुंडाळ, पुणे शहर अध्यक्ष भास्कर गवारे, प्रहार दिव्यांग क्रांती संस्था आंदोलन संघटना पुणे जिल्हा संघटक व दादा ठोंबरे, लक्ष्मण मामा सूर्यभान ढगे, बळीराम इंगळे, गोविंद पौळ, हरिचंद्र पोले, विलास भालेराव, आशाताई साळवे, सतिश सिरस्कर, विनोद शिंदे, मारोती पौळ, देवराव पौळ, वैजनाथ मनदुमले, विनोद वाघमारे, सुनिल ढवळे, ज्ञानेश्वर राठोड अधिक दिव्यांग बांधव उपस्थित होते

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# पद्मजा सिटीमध्ये झालेल्या चोरीचा उलगडा



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेबर-**

शहरातील असर्जन परीसरातील पद्मजा सिटी मध्ये जुलै महिन्यात डॉ. बंसल यांच्या घरी झालेल्या चोरीचीच्या गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला आहे. त्यात तीन आरोपींना अटक करण्यात असुन ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पद्मजा सिटीमध्ये राहणारे डॉ. बन्सल यांच्या घरी चोरी झाल्याची तक्रार दि. १४ जुलै रोजी देण्यात आली होती. डॉ. बन्सल हे परत आल्यानंतर त्यांनी तपासणी करून दिलेल्या सुधारीत जबाबानुसार त्यांच्या घरातून २४ लाख रुपये किंमतीचे २४.५ तोळे सोने आणि ३० लाख रुपये रोख रक्कम अशी मोठी चोरी झाल्याची घटना समोर आली. या प्रकरणात पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधिक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरिक्षक मिलिंद सोनकांबळे, महेश कोरे, साईनाथ पुयड, आनंद बिचेवार यांच्यासह पोलीस अंमलदार रविशंकर बामणे, मिलिंद नरबाग, शेख अजहरोद्दीन, अनिल बिरादार, विश्वनाथ पवार, श्रीराम दासरे, राजकुमार डोंगरे, शेख इमरान, कदम, घोगरे, जोंधळे, माने आणि गायकवाड यांच्यासह सायबर विभागातील पोलीस कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे पथक बनविले. घटनेसंदर्भाने काहीही माहिती नसतांना सुध्दा पोलीसांनी ही चोरी करणाऱ्यांपैकी शेख शफी उर्फ शफी बिल्डर शेख मोईन (४६) रा. उमर कॉलनी देगलूर नाका नांदेड, शेख आमेर उर्फ एडी उर्फ आमू शेख पाशा (२६) रा. गोवर्धनघाट घरकुल, आणि नंदकिशोर वामन देवसरकर (४७) रा. देवसरी ता.उमरखेड जि. यवतमाळ या तिघांना पकडले. ही चोरी करण्यासाठी वापरलेली चार चाकी गाडी क्रमांक एम.एच.२६ बी.सी. ८४४० ही ७ लाख रुपये किंमतीची तसेच १४.५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे किंमत १६ लाख ६३ हजार रुपयांचे तसेच ११ लाख ३७ हजार रुपये रोख रक्कम असा ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

अरोपींना ग्रामिण पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले असुन पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरिक्षक सुनिल भिसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पकडलेल्या तिघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने या तिघांना चार दिवसाची पोलीस कोठडीत सुनावली आहे.



# शिवसेनेचे बोंब मारो आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेबर-**

नांदेड महानगर शिवसेनेच्या वतीने आज महापालिकेसमोर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने जोरदार आंदोलन करून महापालिकेचा तीव्र निषेध करण्यात आला.

महापालिकेच्या गलतान कारभारामुळे शहरातील गोरगरीब जनतेच्या घरात पाणी शिरले. हजारो लोकांच्या घरातील संसार उपयोगी वस्तूचे नुकसान झाले. पूरग्रस्त प्रत्येक कुटुंबास रुपये २५००० आर्थिक मदत द्यावी. घरकुल महा घोटाळ्याचे इडीमार्फत चौकशी करण्यात यावी. कचरा उचलण्याचे शहरातील १०० कोटीचे टेंडर २५० कोटीला दिले . १५० कोटीचे वाटेकरी कोण त्याचा जबाब विचारण्यासाठी शहरातील शेकडो शिवसैनिकांनी पूरग्रस्त महिला व नागरिकांनी महापालिकेला घेराव घालून जोरदार आंदोलन केले. यावेळी शहरातील पूरग्रस्त महिला. ज्येष्ठ शिवसैनिक शिवसेना पदाधिकारी महानगरपालिकेच्या गलतान कारभाराच्या विरोधात जोरदार निषेध व्यक्त करून जोरदार घोषणाबाजी केली. बॉम्ब मारले. महापालिकेच्या आयुक्ताचा निषेध केला. या आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालय ते शिवाजी पुतळा हा रस्ता तब्बल दोन तास जाम झाला होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने तीन चाकी रिक्षावर पालिकेचा प्रतित्मक प्रतिमा तयार करून त्याला गोल रिंगण घालून. मनपाचे आयुक्त. यांच्या कारभाराचे धिंडवडे उडवत शेकडो शिवसैनिकांनी यावेळी बोंब मारो आंदोलन केले. आयोजक महानगर प्रमुख प्रकाश मारावार, मनोज यादव, उपजिल्हाप्रमुख विजय बगाटे, राम चव्हाण, शहर प्रमुख जितू सिंग टाक, नवज्योत सिंग गाडीवाले, गजानन हरकरे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख डॉक्टर निकिता चव्हाण, ज्येष्ठ शिवसैनिक साहेबराव मामीलवाड, निवृत्ती जिंकलवाड, निळकंठ काळे, नंदू वैद्य, बाया शर्मा, मोहीज पठाण, मनोज काकडे, गणेश पेन्सिलवार, माधव कल्याणकर, ब्रिजलाल उगवे, तुकाराम पांचाळ, निकिता शहापूरवाड, शिरीष महाबळे, किरण देशमुख, सतीश कोकाटे, राहुल मानेवर, तुलसीदास नंदाने, सतीश झगडे, खाजाभाई, माजिद भाई, शेख फैयाज, शब्बीर भाई, सुरज फटाले, करण ईटकळ, ॲड. जयश्री खंदारे, मनीष डोईफोडे, ज्योती लिंबापुरे, बालाजी सूर्यवंशी, मुन्ना पीठलोड, दैवशाला जाधव, सुनिता जाधव, गौरव दरभस्तवर, युवा सेनेचे सचिन पाटील., असलम खान, दयासागर शिवरात्री, शशिकांत तादलापूरकर, लक्ष्मीकांत आदलापूरकर, आनंद वाघमारे, राहुल गंगावणे, संदीप जिल्हेवार, यांच्यासह शेकडो पूरग्रस्त महिलांनी डोक्यावर भगवी टोपी घेऊन, हातात फ्लेक्स बॅनर घेऊन महापालिकेच्या विरोधात बोंब मारत सर्वांचं लक्ष वेधले. या आंदोलनात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### नरसीत जुलूस ए मोहम्मदी मोठ्या उत्साहात साजरी

**नायगाव** -इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहंमद पैगंबर यांच्या जयंतीचे औचित्य साधून. नरसीतील सकल मुस्लिम धर्मीयांच्या वतीने ईद -ए- मिलादुन्नबी च्या पार्श्वभुमी वर नरसीत जुलूस ए मोहम्मदी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रतिवर्षा प्रमाणे या ही वर्षी मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त दि.१४ सप्टेंबर २०२५ रोजी रविवारी नायगांव तालुक्यातील नरसीत ईद-ए-मिलादुन्नबी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नारे तकबीर, अल्हाह हू अकबर च्या जयघोषाने नरसी शहर दुमदुमली जागोजागी लिंबू सरबत, फळे, चॉकलेट, बिस्किट व पाणी बॉटल वाटप करण्यात आले. सकळी ९:०० वाजता दारुउलूम अहले सुन्नत नुरीया मुखेड रोड महेबुब नगर येथून जुलूस ए मोहम्मदीला प्रारंभ झाले. त्यानंतर मुखेड रोड या मार्गान मुख्य चौकातुन नांदेड हैदराबाद मार्गे बसस्थानक परिसर, बिलोली रोड मार्गावरून मगदूमनगर येथील मस्जिद येथे पोहचला त्यानंतर फातेहखानी सलाम व दुवा झाल्यानंतर त्याच मार्गान जुने गाव नरसी येथील हजरत खाकीशहावल्ली यांच्या दर्गाह येथे जाऊन फतेहखानी सलाम व दुवा झाल्यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. जुलुस यशस्वीतेसाठी मौलाना शाहीद रजा, सदर हाफीसाब कुरेशी, पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल,सय्यद ईसाक भाई, नजीर बागवान, नजीर शेख,अध्यक्ष एजास बागवान,उपाध्यक्ष सलीम शेख, सय्यद खलील सेठ, सदस्य शाहेद शेख, ईमरान कुरेशी, वसीम सय्यद, ईमरान पठाण, यांनी परिश्रम घेतले. यावेळी नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण भिलवंडे, सरपंच गजानन भिलवंडे, गोविंद टोकलवाड यांच्यासह असंख्य हिंदु बांधव जुलूस ए मोहम्मदी मध्ये सहभागी होऊन मुस्लिम बांधवांना भरभरून शुभेच्छा दिल्या. मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त रामतीर्थ सपोनी विक्रम हराळे यांनी पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे, बिट जमादार चंद्रमणी सोनकांबळे, पो हे कॉ व्यंकट सोनबाजी कामपूर्णे,संजय शिंदे, रुद्रावाड,शेख मुख्तार,गणपत राठोड सह चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त नायगांव पंचायत समितीचे माजी सभापती तथा श्री तुळजाभवानी जिनिंग फ्रेड्रेशनचे नूतन चेअरमन श्रावण भिलवंडे यांनी मौलाना शाहीद रजा, सदर हापीसाब कुरेशी यांचा सत्कार करून नरसीसह परिसरातील सकल मुस्लिम बांधवांना या वेळी शुभेच्छा दिल्या.

### शे.चाँदभाई यांचें निधन

**हिमायतनगर-** तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी सरपंच,भुसार व्यापारी.शे.चाँदभाई यांचा निधन दि. १४ सप्टेंबर रोजी झाले. मृत्यू समयी ते ७० वर्षाचे होते

### तुफानातील दिवे पुरस्काराने कनिष्क सोनसळे सन्मानित

**नांदेड**-महाकवी वामनदादा कर्डक व प्रतापसिंग बोधडे यांच्या संयुक्त जयंती निमित्त नुकताच डॉ.शंकराव चव्हाण पेक्षा गृह येथे आंबेडकरी चळवळीतील सक्रिय सामाजिक कार्यक्रते कनिष्क सोनसळे याची सामाजीक कार्याबद्दल महाकवी वामनदादा कर्डक जीवन गौरव



तुफानातील दिवे पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते सह पत्नीक प्रदान करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संजय निवडुंगे आयोजित महाकवी वामनदादा कर्डक व प्रताप सिंग बोधडे यांचा संयुक्त जयंती सोहळा मोठ्या हर्ष उल्हासात संपन्न होतो याही वर्षी महाराष्ट्रातील अनेक दिग्गज कलावंत मंडळी यांच्या उपस्थिती हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरित्या पार पडला कार्यक्रमाच्या अनुषंगाने समाजातील विविध क्षेत्रातील आपल्या कार्याने भरीव योगदान देणाऱ्या मान्यवरांचे तुफानातील दिवे हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला आहे फुले शाहू आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते कनिष्क सोनसळे यांना सह पत्नीक मानपत्र सन्मान चिन्ह देऊन तूफानातील दिवे हा पुरस्कार कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष इंजि.प्रशांत हिगोले ज्येष्ठ नेते प्रभू सावंत सरस्वतीबाई सोनसळे व सुरेश दादा गायकवाड मित्र मंडळाचे अध्यक्ष भगवान गायकवाड निता सोनसळे मेजर साहेबराव चौदते,ज्येष्ठ कलावत गगाधर वडणे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला आहे कनिष्क सोनसळे यांचे सामाजीक धार्मिक शैक्षैनिक व सांस्कृतीक कार्य समाज उपयोगी व उल्लेखनीय आहे कनिष्क सोनसळे आज तागायत सुशिक्षित बेरोजगार युवकांना मार्गदर्शन शिबिरे धम्म मिळावे विवाह मेळावे आयोजित केले आहे व गोरगरीब कष्टकरी जनतेच्या व विविध प्रश्न वरती व अडीअडचणी वरती वेळोवेळी शासन दरबारी प्रश्न मांडून त्यांना न्याय देण्याचे कार्य केले आहे कनिष्क सोनसळे वंचित बहुजन आघाडीचे सक्रिय व धडाडीचे युवा नेते आहेत त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांना तुफानातील दिवे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे कार्यक्रमाचे आयोजन संजय निवडुंगे यांनी केले असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य विकास कदम व प्रा.अविनाश नाईक यांनी केले आहे.

# सुवर्णकार गणेश मंडळाकडून सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १५ सप्टेबर-**

दरवर्षी प्रमाणे यंदाही नुकताच संपन्न झालेल्या श्री गणेशोत्सव दरम्यान शहरातील सुवर्णकार गणेश मंडळाचे वतीने चालू घडामोडींवर सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.दि.१४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ०५:०० वा.पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

या स्पर्धेत ५,५५५ /- रुपयांचे पहिले बक्षीस सार्थक राजु भोयर याने, ३,३३३/- रुपयांचे द्वितीय बक्षीस पुष्कर प्रवीण जाधव याने, तृतीय बक्षीस २,२२२/- रुपयांचे कु.किरण मनोज जाधव हिने व चतुर्थ बक्षीस १,१११/- रुपयांचे आकाश मारोती बोकूडशेंडे याने पटकावले.

माहुर शहरातील बालाजी मंगलमच्या सभागृहात दि.०५ सप्टेंबर रोजी दू.१ ते २ या वेळेत ही स्पर्धा पार पडली.या स्पर्धेत इयत्ता ८वी ते १२वी पर्यंतच्या एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पारितोषिक वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक गणेश कराड हे होते, तर नगरसेवक गोपू महामुने,जेष्ठ नागरिक सुभाष भगत,नंदकुमार जोशी,सुरेश गिऱ्हे, विश्वजित जाधव, संतोष सावळकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

यावेळी स्पर्धेत भाग घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.पारितोषिक वितरण सोहळ्याला गणेश मंडळाचे अध्यक्ष गणेश गायकवाड, सुनील गजांकुशकर, हर्ष शेवाळकर, विनायक सावळकर,ओम डहाळे,अनिल गजांकुशकर, शिवम सावळकर, उल्हास बोधनकर, अमनखां पठाण, विष्णू वाखरकर, राज भलगे, रुणवाल, सोनू ठाकुर, ओम पाटील, नवनीत देवपुलवार, संतोष मोरे यांचेसह विद्यार्थी, पालक व नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते. प्रास्ताविक शिवम सावळकर यांनी व सूत्रसंचलन अशोक सोळंके यांनी केले तर गणेश गायकवाड यांनी उपस्थीतांचे आभार मानले.

## सार्वजनिक ठिकाणी प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड** -जिल्ह्यात १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या अनुषंगाने शासकीय ध्वजारोहण समारंभ सोहळा शांततेत पार पाडण्यासाठी या काळात कोणताही अनुचित प्रकार घडु नये या दृष्टीकोनातुन नांदेड शहरातील विविध कार्यालय, सार्वजनिक ठिकाणी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत केले आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी १५ सप्टेंबर रोजी सायं ६ वाजेपासून ते दिनांक १७ सप्टेंबर रोजीचे २४ वाजेपर्यंत उपोषण, आत्मदहन, धरणे, मोर्चा, रॅली, सत्याग्रह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे.

# मंत्री भरत गोगावले यांची आ. कोहळीकर यांच्या संपर्क कार्यालयास भेट



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १५ सप्टेबर-**

महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले हे रेणुका देवी दर्शनाकरिता माहूर येथे जात असताना त्यांनी आ. कोहळीकर यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली असून त्यांचे स्वागत व सत्कार डॉ. विवेक कदम कोहळीकर, विवेक देशमुख, संभाराव लांडगे, बबन कदम, सुदर्शन पाटील मनुलेकर यांच्यातर्फे करण्यात आले.

पुढे बोलताना गोगावले म्हणाले की , मागच्या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व पुरामुळे बाधित झालेल्या नुकसानीची भरपाई साठी पंचनामे करून घ्यावे व ज्यांचं नुकसान जास्त आहे त्यांना जास्त प्रमाणात व इतर शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करून घ्यावे असे प्रशासनास आदेश दिले तसेच आम्ही सरकार म्हणून सर्वच शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे नुकसानीची भरपाई व मदत देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असल्याचे देखील यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी अमित कुमार राठोड उपजिल्हाधिकारी रो. ह. यो. उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार सुरेखा नांदे, गट विकास अधिकारी कैलास बळवंत, राजू तंत्रे सहाय्यक कार्यक्रमाधिकारी, बाबुसराव कदम रुईकर, बाबुराव काळे, आबा वानखेडे, गजानन अनंतवार, बबनराव शिंदे, बाळा माळोदे, शिवराज पा. तावडे, तुकाराम तवर, शरद दुगाळे, बाळासाहेब देशमुख उंचेगावकर, विनायक कदम कोहळीकर यांच्यासह कार्यकर्ते, कर्मचारी व पत्रकार बांधव उपस्थित होते. तर प्रशासनाच्या वतीने तालुक्यातील एकूण कुशल निधी १५ कोटी रुपये प्रलंबित आहे याची मागणी सुद्धा मंत्री महोदय यांच्याकडे करण्यात आली.



**राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे लोहा शहरात भाजपाच्या वतीने खोबऱ्याचा हार,व शाल पुष्पहार घालुन जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपाचे माजी प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, माजी.आ. अमर राजूरकर, कार्यक्रमांचे आयोजक भाजपाचे लोहा शहर मंडळ अध्यक्ष गजानन सुर्यवंशी, माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार, माजी जि.प. सदस्य चंद्रसेन पाटील, नगरसेवक बबन निर्मले, माजी जि. प. सदस्य देविदास महाराज गिते, किसान मोर्चाचे माजी प्रदेश सचिव दत्ता शेंबाळे, ॲड विजय धोंडगे, डॉ. सुनील धोंडगे, कंधार मंडळचे गंगाप्रसाद यन्नवार, माजी नगरसेवक अमोल व्यवहारे, युवराज वाघमारे, संदिप दमकोंडवार, नबीसाब शेख, भाजपा युवा मोर्चाचे योगेश पाटील नंदनवनकर, भास्कर ोमेगावकर, सरपंच पुंडलिक बोरगावकर,लोहा बाजार समितीचे संचालक केरबा केंद्रे , देवराव पांडागळे, यशपाल निर्मले, दत्ता शेटे, सतीश आणेराव ,रावसाहेब इंगोले,आशिष व्यवहारे, बाळासाहेब कतुरे, दत्ता पंजपल्ले, लक्की फुलवरे आदी उपस्थित होते.**

# वर्ल्ड पॅरा थेलेटिक्स चॅम्पिअनशीप स्पर्धे साठी भाग्यश्री जाधव यांची निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेबर-**

नांदेडची भूमिपुत्र व पुणे येथील मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी भाग्यश्री जाधव यांची सप्टेंबर महिन्यात दिल्ली येथे होणाऱ्या वर्ल्ड पॅरा थेलेटिक्स चॅम्पिअनशीप-२०२५ या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील होनवडज येथील रहिवाशी असलेली आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिव्यांग क्रीडा स्पर्धे त स्वतःचे आगळे वेगळेस्थान निर्माण केले आहे.

सन २०१७ पासून त्यांची क्रीडा कारर्किद सुरू झाली. ९ वर्षांच्या काळात त्यांनी आजपर्यंत झालेल्या वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेत त्या २३ सुवर्ण,३ रौप्य व ७ पदकांवर नाव कोरले. एकूण ३३ पदकांची त्यांनी कमाई केली. आजपर्यंत त्यांनी ९ देशांमध्ये झालेल्या आंतराष्ट्रीय व जागतिक पातळीवरील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविलेला आहे.

सन २०२१ मध्ये टोकिओ व २०२४ मध्ये पॅरिस येथे झालेल्या पॅरा ऑलिंम्पिक स्पर्धे त सहभागी होण्याचे सौभाग्य तिला लाभले आहे. विशेष म्हणजे गतवर्षी पॅरिसमध्ये झालेल्या पॅरा ऑलिंम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचा ध्वजवादक होण्याचा बहुमान भाग्यश्री जाधव यांना मिळाला आहे. राज्य सरकारने त्यांना शिवछत्रपती पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. तसेच त्यांची मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी-वर्ग एक या पदावर नियुक्ती दिली आहे.

भाग्यश्री जाधव यांची दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू स्टेडीयम येथे दि.२५ सप्टेंबर २०२५ ते दि. ५ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत झालेल्या वर्ल्ड पॅरा थेलिटिक्स चॅम्पिअनशीप-२०२५ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# राष्ट्रीय लोकअदालतीत नांदेड जिल्ह्यात विक्रमी प्रकरणे निकाली

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेबर-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांचे आदेशान्वये नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनिल वेदपाठक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा व सत्र न्यायालय नांदेडच्या प्रांगणात शनिवार १३ सप्टेंबर रोजी लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड जिल्हयामध्ये एकुण ५ हजार ५४ प्रकरणे सामोपचाराने निकाली निघाली असून २० कोटी २४ लाख १६ हजार ५१२ इतक्या रकमेबाबत विविध प्रकरणात तडजोड झाली.




या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनिल वेदपाठक हे होते. तसेच डॉ. एस.डी. तावशीकर, जिल्हा न्यायाधीश-२, शरद देशपांडे सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड, अध्यक्ष अभिवक्ता संघ नांदेड व रणजीत देशमुख जिल्हा सरकारी वकील नांदेड, नांदेड येथील सर्व न्यायाधीश उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुनिल वेदपाठक यांनी राष्ट्रीय लोकअदालतीच्या उद्घाटन समारंभासाठी उपस्थित पक्षकारांना लोकअदालतीचे महत्व प्रभावीपणे सांगितले. चित्रपटातील संवादाचा आधार घेतला ''माझ्याकडे गाडी आहे, पैसा आहे, चांगला वकील, पुरावे देखील आहेत तुझ्याकडे काय आहे? यावर समोरच्या पक्षकाराने असे म्हणाले पाहिजे ''माझ्याकडे लोकन्यायालय आहे''. त्यामुळे लोकअदालत ही एक संधी असून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपस्थित पक्षकारांना केले.

प्रास्ताविकात आपली प्रकरणे तडजोडीने मिटवून घ्यावीत. कधी-कधी तडजोड करुन शांती मिळवणे गरजेचे असते. लोकन्यायालय ही त्यासाठी संधी असून त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शरद देशपांडे, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड यांनी केले.

नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका न्यायालयात व कौटुंबिक न्यायालय नांदेड येथे शनिवार १३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये दिवाणी, फौजदारी, धनादेश अनादरीत झालेली प्रकरणे, बँक प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसानभरपाई, भूसंपादन, लोहमार्ग गुन्हा कबुली प्रकरणे, ग्रामपंचायतीचे घरपट्टी व पाणीपट्टीचे प्रकरणे तसेच कौटुंबिक न्यायालय, कामगार न्यायालय व सहकार न्यायालय येथील प्रलंबीत प्रकरणांचा व नांदेड वाघाळा महानगर पालिका, पंचायत समिती व ग्रामपंचायतींचे वसुली प्रकरणे, विविध बँकांचे तसेच विद्युत प्रकरणे, दूरसंचार विभागाचे टेलिफोन, ट्रॅफिक चालन इत्यादींचे दाखलपूर्व प्रकरणांचा समावेश होता. तसेच पाच दिवस घेण्यात आलेल्या विषेश मोहिमेअतंर्गत ११८४ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

या लोकअदालतीमध्ये जास्तीतजास्त प्रकरणे निकाली काढून लोकअदालत यशस्वी करण्याकरिता प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली शरद देशपांडे सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड, मुख्यालयातील व तालुकास्तरावरील सर्व जिल्हा न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश यांनी विषेश प्रयत्न केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे यांनी या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये परिश्रम घेतलेल्या सर्व न्यायालयीन कर्मचारीवृंदांचे आणि प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार व्यक्त करुन यापुढेही अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.